बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे

गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक २८ | बुधवार,दि. २१ जून २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

बनावट ई पावत्यांवर वाळूचा अवैध धंदा जोरात, दंतेवाडा-अकोलाच्या नावावर शहरातच फेऱ्या

गोंदिया– कोट्यवधी रुपयांची रॉयल्टी सरकारच्या तिजोरीत भरणाऱ्या वाळू ठेकेदारांवर अंकुशच नसल्याने बोगसगिरीद्वारे वाळूचा लाखो रुपयांचा उपसा केला जात आहे. यातून सरकारचा लाखो रुपयांचा महसूल बुडवला जात असला तरी तोच महसूल अनेकांना गब्बरही करत आहे.ठेकेदारांबरोबर सरकारी यंत्रणेचेही हात बरबटले गेल्याचे जाहीर होत असल्याने ठेकेदारांकडे होत असलेल्या दुर्लक्षाचा रोख दिसून येतो.


eTP No : 11272120

Vehicle Number	MH35AJ0027
Vehicle Driver Name	Khumesh
Driver Mobile Number	8766976522
Owner Name	Saheskumar Chandravanshi
Owner Mobile Number	9511876855
Destination	Deori, Akot, Akola
Distance (km)	453.0KM
Created date and time of eTP	04/06/2023 01:38 PM
eTP validity date and time	05/06/2023 12:23 PM
Minor-Mineral Type	Sand
Quantity(Brass)	5.0

--- Used Barcode ---
80000021468725
80000021411315
80000021437132
80000021467872
OK

eTP No : 11290963

Vehicle Number	MH46BF6781
Vehicle Driver Name	Vishal Kore
Driver Mobile Number	9284433217
Owner Name	Vishaal Kore
Owner Mobile Number	9284433217
Destination	Dantewada, Dantewada
Distance (km)	456.0KM
Created date and time of eTP	05/06/2023 11:57 AM
eTP validity date and time	06/06/2023 10:57 AM
Minor-Mineral Type	Sand
Quantity(Brass)	5.0

--- Used Barcode ---
80000021417866
80000021440061
80000021377269
80000021354082
80000021413623
OK

महसूल प्रशासनासह पोलिसांनाही गुंगारा देण्यात वाळूचोर यशस्वी होत असून,चोरीची वाळू वाहतूक करण्यासाठी आता बनावट पावत्यांचा आधार घेत असल्याचे समोर येऊ लागले आहे.गोंदिया तालुक्यातील तेढवा वाळूघाटाची पाहणी केली असता त्या घाटावर काम करणाऱ्याकडून ज्या ई पावत्या बघावयास मिळाल्या,त्यावर कुठल्या घाटातील वाळूची वाहतूक केली जात आहे,हे लिहिलेलेच नाही.

तर ज्या वाहनांचा उल्लेख छत्तीसगड राज्यातील दंतेवाडा व अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील देवरी येथे वाळू वाहतूकीकरीता ईटीपी तयार करण्यात आली.त्या वाहनांच्या वाहनचालकांशी संपर्क केल्यावर ते वाहन त्या ठिकाणी पोचलेच नसल्याचे तपासणी दरम्यान समोर आले.जिल्ह्यातील वाळू घाटांचे लिलाव रद्द झालेले असून तेढवा येथील वाळू घाटावरुन काही वाळू ठेकेदारांचा शिल्लक साठा असल्याने त्यांना ५ जूनपर्यंतच साठा विकण्याची परवानगी देण्यात आल्याचे खनिकर्म विभागाचे म्हणने आहे.याउलट वाळू कंत्राटदार तर नदीपात्रातून वाळूचे उत्खनन मोठ्याप्रमाणात करीत असल्याने दररोज सकाळी व सायकांळी वाळूचे टिप्पर शहराच्या दिशेने मोठ्या संख्येने येत असताना उपविभागीय अधिकारी,तहसिलदार,मंडळ अधिकारी व तलाठी यांना कसे दिसत नाही हा प्रश्न निर्माण झालेला आहे.गेल्या सहा महिन्यात महसुल विभागाच्या एकाही अधिकाऱ्यांने वाळूच्या वाहनांवर कारवाई केल्याचेही दिसून येत नाही.

विविध नद्यांमध्ये वाळू उपसा करण्याचे ठेके खनिकर्म विभागाकडून दिले जातात.ते देत असताना नदीच्या कोणत्या ठिकाणी किती लांबीमध्ये उपसा करायचा हे ठरलेले असते. तेथील वाळूची उपलब्धता व मातीचे प्रमाण यावरुन त्या ठेक्याची किंमत कमी अधिक होते. त्या ठेक्यातून किती ब्रास वाळू उपसा करायची याचीही मर्यादा ठरलेली असते. ही मर्यादा समजून येण्यासाठी पावती पद्धतीचा अवलंब केला जातो. त्यातूनच या बोगसगिरीची सुरुवात होते. मर्यादेपेक्षा जास्त वाळू उपसा केला तरच या ठेक्यातून मोठा पैसा कमावण्याची संधी असते. त्यामुळे बोगस पावतीचा वापर सर्रास केला जातो. जितकी वाळू अधिकृत दाखवायची, त्याच्याच पावत्या वाहतूकदारांना द्यायच्या. अन्य वाळूचा काळा धंदा करण्यासाठी पावत्या चुकीच्या द्यायच्या किंवा गायब होणाऱ्या शाईने लिहून द्यायच्या ही बोगसगिरी चालू असते. त्याबाबत आतापर्यंत केंव्हाही ठेकेदारांवर कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. यामध्ये वाहतूकदार बळीचा बकरा होतो.आता तर ईपासमध्येही मोठ्याप्रमाणात हेराफेरी होत असल्याचे दिसून येत आहे.

ज्या पावत्या दिल्या जातात त्या योग्य आहेत की नाहीत हे ट्रक वाहतूकदारांना माहिती नसते. त्यातून बहुतांश फेऱ्या या बोगसगिरीच्या ई पासवर होत राहतात. या एका ई पासवर अनेक फेऱ्या मारुन वाहतूकदार कमावतो. तो शहरात ट्रकचा दर वाढवून. पण ठेकेदार एका ट्रकसाठीचे पैसे पूर्णपणे कमावतो. त्यांच्या या कमावण्याची माहिती असताना वरिष्ठ महसुल अधिकाऱ्यांचे हात ओले केले जात असल्याने या ठेकेदारावर फार मोठी कारवाई होत नसल्याचा आरोप एका वाहतूकदाराने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.

वाळूमाफियांनी शहरात रान माजविले आहे. महसूल प्रशासनासह पोलिसांनाही गुंगारा देण्यात वाळूचोर यशस्वी होत असून, चोरीची वाळू वाहतूक करण्यासाठी आता बनावट ई पावत्यांचा आधार घेत असल्याचे समोर आले असून जिल्हा खनिकर्म अधिकारी वाढवे यांना प्रतिनिधीच्या हाती लागलेल्या ईपावत्या दाखविल्या असता त्यांनी बोगस असल्याचे सांगितले.

पावत्या ठेक्यावरुन घेतल्या

दिलेली पावती बनावट आहे की खरी, याबबत वाहनचालक अनभिज्ञ असतो. त्याला केवळ गाडीत भरलेली वाळू इकडून तिकडे नेण्याची जबाबदारी दिलेली असते. त्यामुळे संबंधित ठेकेदारावरही कारवाई होणे अपेक्षित असल्याचे एका टिप्पर चालकाने सांगितले.

ओबीसींसाठीचे वसतिगृह, स्वाधार योजना कागदावरच

गोंदिया: दहावी, बारावीचे निकाल लागले आणि नवीन शैक्षणिक वर्षांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली तरी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात संपूर्ण राज्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरूकरण्याची केलेली घोषणा अद्याप प्रत्यक्षात उतरली नाही. परिणामी, पुढील शिक्षणासाठी शहरात येऊ इच्छिणाऱ्या ओबीसी विद्यार्थ्यांसमोर मोठी समस्या निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातील ओबीसी, व्हीजे, एनटी आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शहरात शिक्षण घेण्यात मुख्य अडसर आहे तो निवास आणि भोजनव्यवस्थेचा. त्यामुळे गुणवत्ता असून देखील केवळ आर्थिक अडचणीमुळे शेकडो ओबीसी मुले-मुली शहरात शिक्षण घेण्यापासून वंचित राहतात.

ओबीसी विद्यार्थ्यांसमोरील हा अडसर दूर करण्यासाठी विविध ओबीसी संघटनांनी सामाजिक न्याय खात्याप्रमाणे ओबीसींच्या स्वतंत्र वसतिगृहांसाठी आग्रह धरला होता. त्याची दखल घेत विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात फडणवीस यांनी राज्यातील सर्व जिल्ह्यात दोन वसतिगृह सुरू करण्याची घोषणा केली. राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये ओबीसी विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी दोन अशी ७२ शासकीय वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय झाला. भाड्याने इमारती घेऊन वसतिगृह सुरू करायचे असल्याने त्यासाठी ८ मे २०२३ पर्यंत प्रस्ताव मागवण्यात आले. पुढे एका महिन्यात त्या प्रस्तावांची छाननी करुन अंतिम निर्णय घेणे अपेक्षित होते. मात्र, अद्याप राज्यातील एकाही प्रस्तावावर निर्णय झाला नसल्याची माहिती आहे.

त्यामुळे शैक्षणिक सत्र सुरू होण्यापूर्वी वसतिगृह उपलब्ध होण्याची शक्यता कमी आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी वसतिगृहाअभावी जिल्ह्याच्या ठिकाणी येऊन शिक्षण घेऊ शकणार नाहीत. त्यामुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होईल, याकडे स्टुडंटस राईटस असोसिएशन ऑफ इंडियाचे अध्यक्ष उमेश कोरराम यांनी लक्ष वेधले आहे.

वित्त विभागाचा योजनेबाबत प्रतिकूल शेरा?

सामाजिक न्याय विभागाच्या स्वाधार योजनेत शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या पात्र विद्यार्थ्यांच्या खात्यात निवास आणि भोजनाच्या खर्चाची रक्कम जमा केली जाते. या धर्तीवर ओबीसी विद्यार्थ्यांसाठी योजना सुरू करण्याची मागणी करण्यात आली होती. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात २९ डिसेंबर २०२३ ला विधानसभेत स्वाधारसारखी योजना सुरू करण्याची घोषणाही केली होती. परंतु, ती योजना अद्याप लागू करण्यात आली नाही. काही अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, या योजनेबाबत वित्त विभागाचा प्रतिकूल शेरा असून मंत्रिमंडळाची अद्याप मंजुरी मिळालेली नाही.

काँग्रेस बचाओ समितीचे २५ जूनपासून उपोषण

गोंदिया: गोंदिया आणि गोरेगाव तालुक्यातील बाजार समितीच्या निवडणुकीत तसेच सभापती व उपसभापती निवडणुकीत जिल्हाध्यक्ष दिलीप बन्सोड आणि उपाध्यक्ष अशोक गुप्ता यांनी पक्षश्रेष्ठींच्या आदेशाचे उल्लघंन केले. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई व्हावी,यासाठी काँग्रेस बचाओ समिती तयार करुन साखळी उपोषण करावे लागले होते. त्यावर १० दिवसांची मदुत वरिष्ठांनी दिली होती. मात्र अद्यापही त्यावर निर्णय घेण्यात आला नाही. साधी चौकशीही झाली नाही. त्यामुळे पुन्हा १५ जूनपासून उपोषण करण्यात येईल, असल्याची खात्रीदायक माहिती सुत्रांनी दिली.

गोंदिया विधानसभा मतदार संघात काँग्रेस बळकट होता. मात्र गोपालदास अग्रवाल यांनी २०१९ मध्ये काँग्रेस सोडल्यानंतर पक्षाला गळती लागली. त्यातून वाट सावरत जुन्या कट्टर काँग्रेसी कार्यकर्त्यांनी पुन्हा मोट बांधणी करणे सुरु केले. मात्र त्यातही आता गटबाजी सुरु असल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला. गोंदिया व गोरेगाव बाजार समितीच्या निवडणुकीत जिल्हाध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या मर्जीमुळे पक्षात भेदाभेद झाल्याचा आरोप करत १ ते ४ जून पर्यंत काँग्रेस बचाओ समितीच्या निवडणुकीत जिल्हाध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांच्या मर्जीमुळे पक्षात भेदाभेट झाल्याचा आरोप करत १ ते ४ जून पर्यंत काँग्रेस बचाओ समितीच्या माध्यमातून साखळी उपोषण करण्यात आले होते. वरिष्ठांनी १० दिवसांत विचार करुन कारवाई करण्याचे आश्वासन दिले होते. कसलीही हालचाल नसल्यामुळे आता पुन्हा १९ जूनपासून साखळी उपोषण सुरु करण्यात आले असून २५ जूनपासून उपोषण करण्याचा इशारा दिला असल्याची माहिती सुत्रांनी दिली. यासंदर्भात काँग्रेसचे राज्य उपाध्यक्ष नाना गावंडे यांना कल्पना देखील देण्यात आली आहे.

३० जूनपूर्वी शाळा सुरू केल्यास कारवाई, खासगी शाळांना शिक्षण विभागाची ताकीद

गोंदिया : जिल्ह्यात सध्या उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे विदर्भातील सर्व शाळा ३० जूनपासून सुरु करण्याच्या सूचना शासनाने केली आहे.

असे असताना जिल्ह्यातील काही खाजगी संस्थाकडून १२ जूनपासूनच शाळा सुरु करण्यात आलेल्या आहेत.अशा शाळांवर कारवाई करण्याची मागणी काही सामाजिक संस्थाकडून करण्यात आल्यानंतर शिक्षण विभागाकडून या शाळांना ३० जूनपर्यंत शाळा बंद ठेवण्याची ताकीद पत्राद्वारे दिली आहे. मृग नक्षत्रात मान्सून लांबणीवर गेल्याने उन्हाच्या तीव्र झळांचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे.

सूर्य सातत्याने आग ओकत असल्याने जनजीवन होरपळत असताना याचा सर्वाधिक त्रास लहान मुलांना होत आहे. शासनाकडून विदर्भातील सर्व शाळा ३० जूननंतर सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे.

असे असताना जिल्ह्यातील काही खासगी शाळांनी १२ जूनपासून शाळा सुरू केल्या. त्यामुळे भर उन्हात विद्यार्थ्यांवर शाळेत जाण्याची नामुष्की ओढवली, हा सर्व प्रकार पाहता जिल्ह्यातील काही सामाजिक संघटनांनी शाळांच्या या अरेरावी प्रकाराबद्दल विरोध करीत जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे तक्रार नोंदवून या शाळांवर कारवाई करण्याची मागणी केली होती.

भंडारा जिल्ह्यात सारस गणनेत चार पक्षांची नोंद

भंडारा : भंडारा जिल्ह्यात सारस पक्षी गणना रविवार १८ जून ला घेण्यात आली. दरवर्षी जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात सारस पक्षी गणना घेण्यात येते. यावर्षी घेण्यात आलेल्या सारस गणनेत भंडारा जिल्ह्यात चार सारस पक्षी आढळले व त्यांची नोंद घेण्यात आली.

जिल्ह्यात भंडारा, मोहाडी व तुमसर तालुक्यातील वैनगंगा व त्याच्या उप नद्यांच्या क्षेत्रातील संभावित सारस अस्तित्व असलेल्या १९ ठिकाणी गणना करण्यात आली. तुमसर तालुक्यातील गोंडीटोला येथील तलाव व लगतच्या शेती शिवारात सकाळी ६ वाजता चार सारस विचरण करताना आढळले. ह्यात दोन वयस्क व दोन सम वयस्क सारस होते. २०१७ पासून भंडारा जिल्ह्यात नियमित सारस गणना भंडारा वन विभागाने सेव्ह इकोसिस्टेम अँड टायगर (सीट) भंडारा व सेवा संस्था, गोंदिया या स्वयंसेवी संस्था सोबत संयुक्तपणे घेतलेला आहे. २०१७ ला ३, २०१८ ला २, २०१९ ला ३, २०२० ला २, २०२१ ला २, २०२२ ला ३

सारस ची नोंद घेण्यात आली होती. ह्या वर्षी जिल्ह्यातील सारस संख्या एक ने वाढून चार झाली आहे.

उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने स्वयंसंज्ञानाने घेतलेल्या जनहित याचिका PIL No. ०२/२०२१ च्या आदेशाने जिल्ह्याचा ङ्गसारस संवर्धन आराखडाफ बनविण्यात आलेला आहे. सदर सारस गणना जिल्हा सारस संवर्धन समिती अध्यक्ष जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर ह्यांच्या नेतृत्वात व जिल्हा सारस संवर्धन समिती सचिव उपवन संरक्षक राहुल गवई ह्याच्या मार्गदर्शनात घेण्यात आली.

सारस गणनेत जिल्ह्यातील ९ सारस मित्र, ३१ स्वयंसेवकांनी भाग घेतला. अनय नावंदर, परिविक्षाधीन भारतीय प्रशासकीय सेवा अधिकारी, शाहिद खान, मानद वन्यजीव रक्षक, नदीम खान, मानद वन्यजीवरक्षक भंडारा, साकेत शेंडे, सहायक वन संरक्षक, राजकमल जोब, वरिष्ठ पक्षी अभ्यासक व माजी मानद वन्यजीव रक्षक, सावन बाहेकर सेवा संस्था गोंदिया, सी.जी. रहांगडाले वन परिक्षेत्र अधिकारी तुमसर, संजय मेंढे वन परिक्षेत्र अधिकारी भंडारा, मनोज मोहिते वन परिक्षेत्र अधिकारी नाकाडोंगरी, सीट संस्था वाइल्ड वॉच स्वयंसेवी संस्था त्यांचे प्रतिनिधी व तुमसर, जांबकांद्री, नाकाडोंगरी व भंडारा वन परिक्षेत्रातील वन कर्मचाऱ्यानी सहयोग दिला.

रानटी हत्तींचा कळप आता परतीच्या प्रवासाला



गोंदिया : २६ एप्रिल पासून १५ जून पर्यंत मलकाझरी येथे वास्तव्याला असलेला रानटी हत्तीचा कळप आता परतीच्या प्रवासाला लागला असून सध्या गेल्या तीन-चार दिवसांपासून इटियाडोह धरण परिसरात त्यांचा मुक्त संचार सुरूआहे. हत्तीच्या दर्शनासाठी पर्यटकांची पावले सध्या इटियाडोह धरणाकडे वळत आहेत.१५ जून रोजी हत्तींचा कळप चुटीया ते झाशीनगर येथील जंगलमार्गे भ्रमंती करत रात्री अंदाजे १२ वाजता तिडका या गावामध्ये पोहोचला. या गावाशेजारी एक वनतलाव आहे. त्या ठिकाणी बराच वेळ थांबला. जेव्हा गावकऱ्यांना हत्तीच्या ओरडण्याचा आवाज आला, तेव्हा गावकरी घाबरून एकमेकांच्या घराच्या छतावर जावून थांबले होते. या दरम्यान हत्तींनी कोणालाही कसलाच त्रास न देता पुढे येरंडी दर्रेच्या जंगलाच्या दिशेने मार्गक्रमण केले. १६ जून रोजी परत सकाळी १० च्या सुमारास हत्तीच्या कळपाचे लोकांना दर्शन झाले. इटियाडोह जलाशयामध्ये हत्तीचा कळप अंघोळ करताना एक किलोमीटर अंतरावरून बऱ्याच नागरिकांनी त्यांना पाहिले. कळप येरंडी जंगलमार्गे इटियाडोह धरणाकडे वळला आहे, अशी माहिती तिडका, येरंडी येथील गावकऱ्यांनी दिली.राष्ट्रीय उद्यानाचे वनपरिक्षेत्राधिकारी सचिन डोंगरवार यांनी या बाबीला दुजोरा दिला आहे. गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्याच गोंदिया जिल्ह्यात धूमाकुळ घातलेल्या रानटी हत्तींच्या कळपाने अर्जुनी मोरगाव तालुक्यात २६ एप्रिल रोजी पुनरागमन केले होते.

तर आमगाव-गोंदिया प्रवास ६० किमीचा

पावसाळ्यात पांगोलीचा पूल, रोखणार वाहतूक: बांधकाम संथगतीने

गोंदिया: गेल्या दीड वर्षांपासून राष्ट्रीय महामार्ग गोंदिया-आमगाव रस्त्याचे काम संथ गतीने सुरु आहे. गोंदिया जिल्हा परिषदेच्या जवळ असलेल्या मार्गावरील पांगोली नदीवरील पूलाचे काम पावसापुर्वी पूर्ण झाले नाही, तर वाहतुकीसाठी एकच पर्याय उरला आहे. जे गोरेगाव-ठाणा रस्त्याने आमगाव येथे जाता येते. तसे झाल्यास आमगावकरांना ३० किमी अंतर पार करण्यासाठी नागरिकांना ६० किमीचा प्रवास करावा लागणार आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र.५४३ अंतर्गत गोंदिया-आमगाव रस्त्याचे काम गेल्या दीड वर्षांपासून सुरु आहे. मात्र कामाच्या संथ गतीने हे काम निर्धारित वेळेत पूर्ण होणार नसल्याचे दिसून येत आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेच्या मागून पांगोली नदी वाहते. या पांगोली नदीवरील पूल तोडून नवीन पूल तयार करण्यात येत आहे. सध्या पांगोली नदीच्या पात्रातून वळणाचा मार्ग करण्यात आला आहे. या मार्गावरुन वाहतूक सुरु आहे. मात्र पांगोली नदीवर बांधण्यात येत असलेल्या पुलाचे काम लवकर पूर्ण न झाल्यास पावसाळ्यात गोंदिया-आमगावचा संपर्क तुटणार आहे. संपर्क तुटल्यास आमगाव, देवरी, सालेकसाकडून जिल्हा मुख्यालयी येणाऱ्या नागरिकांना कमालीचा त्रास सहन करावा लागणार आहे. सध्याची बांधकामाची गती बघता पावसाळ्यापुर्वी पुलाचे काम पूर्ण होणे अशक्य आहे.

पावसाळ्यात वाहतुकीला अडथडा निर्माण होऊ शकतो. कारण पांगोली नदीला इतका पूर येतो की, या मार्गावरुन जाणाऱ्यांना दुसऱ्या मार्गाचा अवलंब करावा लागतो. पांगोली नदीच्या पुलाचे काम ३० जूनपुर्वी पूर्ण न केल्यास पावसाळ्यात वाहतूक ठप्प होईल. कारण पांगोली नदीच्या पात्रातून तयार केलेला रस्ता पूरात वाहून जाणार आहे.

गोरेगाव-ठाणा रस्ता धोक्याचाच

- आधीच गोरेगाव-ठाणा रस्ता अरुंद आहे.
- या मार्गावरुन वाळूच्या टिप्परसह मोठ्या वाहनांची वाहतुक सुरु असते.
- रस्त्यांच्या अरुंदपणामुळे या रस्त्यावर दररोज अपघात होत आहेत.
- अनेक घटनांमध्ये अपघातग्रस्तांना जीव गमवावा लागला असून या मार्गाचा वापर गोंदिया-आमगावसाठी केल्यास अपघाताची शक्यता अधिक वाढणार आहे.

युद्धपातळीवर प्रयत्न सुरु

राष्ट्रीय महामार्गावरील पांगोली नदीवर पूल बांधण्यात येत आहे. पावसाळ्यापुर्वी बांधकामे पूर्ण करुन वाहतूक सुरु करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. पावसापुर्वी बांधकामे पूर्ण न झाल्यास गोरेगाव-ठाणा रस्त्याचा वापर करावा लागू शकतो. मात्र पावसाळ्यापुर्वी पुलाचे बांधकाम पूर्ण करण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

एन.बोरकर, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग

रतनारा,निलागोंदी परिसरात अवैध गौणखनिजाचे उत्खनन

गोंदिया:– गोंदिया तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यातील अन्य भागात सुध्दा गौणखनिज उत्खननावर वाळू, दगड, मुरुमाचा बेकायदा उपसा आणि चोरटी वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले आहे.गेल्या अनेक महिन्यापासून धापेवाडा ते गोंदिया व आसोली-बटाणा-गोंदिया मार्गावर दरदिवसाला मुरुम घेऊन जाणाऱ्या ट्रकची संख्या मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. सकाळपासून सायकांळपर्यंत मुरुम वाहतूकीचा अधिकृत परवाना नसतानाही वाहन जात असताना त्यावर कारवाई मात्र केली जात नाही.त्यामुळे गोंदिया तालुक्यातील गौणखनिजाचा मोठा महसूल या चोरटी वाहतूक व उत्खननातून बुडत आहे.

पोलीस विभागाच्यावतीने मध्यतंरी अवैध गौणखनिजाचे उत्खनन व वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करण्यात आली,मात्र महसूल विभागाच्या उपविभागीय अधिकारी, तहसीलदार,मंडळ अधिकारी व तलाठी यांच्याकडून कारवाई करण्यात आल्याचे कुठेच दिसून येत नाही.

गोंदिया तालुक्यात गेल्या वर्षभरात कुणालाही गौणखनिज मुरुम माती उत्खननाकरीता खासगी व्यक्तीला परवानगी देण्यात आलेली नाही.मात्र राष्ट्रीय महामार्गाच्या कामाकरीता लागत असलेल्या माती व मुरुमाकरीता जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार रस्ता बांधकाम कंपनीलाच फक्त परवानगी शासकीय धोरणानुसार देण्यात आली आहे.

प्रकाश तिवारी, नायब तहसीलदार

भरारी पथकांची कारवाई शून्य

गौण खनिज उत्खनन व वाहतुकीवर आळा घालण्याकरिता गोंदियाच्या उपविभागीय अधिकाऱ्यांनी भरारी पथकाची निर्मिती केली. या पथकने वीस दिवसांत एकही कारवाई केली नाही. गोंदियात प्रशासकीय इमारत असलेल्या चौकातूनच दिवसभर अवैध गौण खनिजाचे वाहतूक करणारे टिप्पर जात असतात. तरीही भरारी पथकातील नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी व तलाठी यांच्याकडून कारवाई करण्यात आलेली नाही. हे घडत असतानाच रविवारी नायब तहसीलदार प्रकाश तिवारी यांच्या नेतृत्वातील भरारी पथकाने निलागोंदी परिसरात पाहणी केली. पथक येण्याची पूर्वकल्पना मिळताच अवैध गौण खनिज खोदकाम करणारे पसार झाले. परिणामी पथकाला रिकाम्या हाताने परत यावे लागले. सोमवार,मंगळवारला सकाळीही गोंदियात अवैध उत्खनन करणारे गौण खनिजाचे टिप्पर शहरात आले,पण पथकाचा थांगपत्ता नव्हता.

गोंदिया तालुक्यातील रतनारा परिसरात असलेल्या शासकीय जिल्हा परिषदेच्या तलावातून अवैधरित्याअ रात्रीला व पहाटेच्या तलावातूनही मुरुममातीचे अवैध उत्खनन करतांना आढळून आले.उत्खनन करतेवेळी सदर वाहनचालकाने खासगी मालमत्ता असून परवानगीची गरज नसल्याचे सांगत जमीन मालकाच्या परवानगीने खोलीकरण करीत असल्याचे सागंत टाळण्याचा प्रयत्न केले. याच परिसरात रायपूर, कोहका, निलागोंदी,सेजगाव परिसरात मोठ्याप्रमाणत उत्खनन झाल्याने पहाडे ओसाड झाली आहेत तर तलाव व जमिनीवर मोठमोठ गढ्डे उत्खननामुळे दिसून येत आहेत.

जिल्ह्यात खदानींतून दगडाचा उपसा करण्यासाठी परवाना देण्यात आला नाही, तरीही दगड, खडीची वाहतूक करण्यात येते. शासनाच्या आदेशानुसार गौण खनिजांची चोरटी वाहतूक रोखण्यासाठी भरारी पथक स्थापन करण्यात आले आहे.मात्र या भरारी पथकाने गेल्या सहा महिन्यात काय केले अशा प्रश्न निर्माण झालेला आहे.

रतनारा परिसरात सुरु असलेल्या उत्खननाबाबत या परिसराचे तलाठी बाळासाहेब साखरे यांना विचारणा केल्यावर आपल्याकडे कुणीही उत्खननाची परवानगी मागितली नसल्याचे सांगितले.तसेच या भागातून मुरुम घेऊन वाहन जात असल्याचे लक्षात आल्यामुळे आपण दोन दिवसापुर्वीच तहसिलदारांना पत्राद्वारे सुचना दिल्याचे सांगितले.

यासंदर्भात गोंदिया ग्रामीणच्या तहसिलदार व प्रभारी उपविभागीय अधिकारी मानसी पाटील यांच्याकडून माहिती जाणून घेण्याकरीता संपर्क करण्यात आले असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

संपादकीय

शिंदेसाहेब, ही जाहिरात तयार करणाऱ्याला "महाराष्ट्र-भूषण" द्या!

सध्या महाराष्ट्र ताण-तणावाखाली आहे. राजकीय तणाव आहे. सामाजिक तणाव आहे. मानसिक तणाव आहेच.शहरांत वाहतूक कोंडी आहे. चार-चार पाच-पाच तास वाहतूक कोंडीत जीव गुदमरत आहे.प्रवास लवकर व्हावा म्हणून महामार्ग झाले. पण, या महामार्गावर एका टँकरला आग लागते.आणि मुंबईच्या बाजूला चार तास आणि पुण्याच्या बाजूला चार तास वाहतूक ठप्प राहते.प्रवास करणारे वृद्ध, रुग्ण, डायबेटीसवाले, या सर्वांच्या हालाला सीमा नाही. नाशिकला जायला पाच-सहा तास लागताहेत.पुण्याची स्थिती तीच झाली आहे. बाजारात महागाई आहे.बेरोजगारी तर भरपूर आहे. रोजगार नाही ते तरुण टपोरीपणाकडे वळत आहेत.धमक्या सुरूआहेत.मधून मधून दंगली घडवल्या जात आहेत.हे सगळे का होते आहे.कोण करते आहे.कशाकरिता करते आहे.याची चर्चा सगळे करताहेत.सगळ्यांना उत्तरं माहिती आहेत... पण,"सहन करता येत नाही.आणि बोलताही येत नाही'..इतक्या तणावाखाली लोकं आहेत.कांद्याला भाव नाही म्हणून शेतकऱ्यांना कांदा फेकून द्यावा लागला. टोमॅटोला भाव नाही म्हणून टोमॅटो उत्पादकांची हालत खराब आहे. तिकडे विदर्भात तर आता खरिपाच्या कापूस पेरणीचा हंगाम समोर आला आहे.पण, गेल्यावर्षीचा कापूस कास्तकाराला घरात भरून ठेवावा लागला आहे. त्या गरिब कास्तकराची घरे म्हणजे महाल नव्हेत.... खोल्या- दोन खोल्यांची कौलारू बैठी घरे.. त्यात चुली पेटवणे... घराच्या बाहेर पाणी तापवायला चुलाण टाकणे...श्रमणारा शेतकरी विडी-काडी ओढणारा... भरून ठेवलेल्या कापसाला आग लागण्याची एवढी भिती असताना आज भाव मिळेल... उद्या भाव मिळेल म्हणून वाट बघत हजारो शेतकरी घरात बसलेत... अवकाळी पावसाने नुकसान करुनच टाकले आहे. सरकारच्या ते गावीसुद्धा नाही. मदतीच्या घोषणा वृत्तपत्रांच्या पानावर राहिल्या.प्रत्यक्ष किती मदत पोहोचली... घोषणांपर्यंतच थांबली.आज विदर्भात अशी स्थिती आहे की, तीन हजारांच्या खाली कापसाचा भाव पडला आहे. सरकारची योजना कागदावर आहे. एक काळ असा होता की, नागपूरच्या कॉटन मार्केटमध्ये महाराष्ट्र शासनाच्या "एकाधिकार कापूस खरेदी'चा दबदबा होता. आज ती योजना कागदावरच राहिली आहे. पडलेल्या भावात कापूस विकायला शेतकरी तयार नाहीत...६ हजार रुपये भाव मिळणे शक्य नाही...कोणी देतही नाही...कारण शेतकऱ्याच्या बाजूने बोलणारे आहे कोण? सरकारला सध्या गतिमान जाहिराती करण्यात इतका वेळ चालला आहे की, मुख्य प्रश्न सगळे बाजूला पडलेले आहेत. लोकांच्या जीवन-मरणाचे प्रश्न आहेत. त्याकडे पहायला वेळ नाही... "सरकार आपल्या दारी' आल्याची घोषणा आहे. पण, सगळे लक्ष आकडेवारी आणि टक्केवारीत आहे. किती टक्के मतं कोणाला आहेत.... आणि कोण पुन्हा पंतप्रधान आणि कोण पुन्हा मुख्यमंत्री... याचे हिशेब पान-पान जाहिराती करून झळकवले जात आहेत. सध्या खूष आहेत ती वृत्तपत्रे. कारण शिंदे सरकार आल्यापासून जाहिरातींना तोटा नाही. रोज एक "गतिमान' जाहिरात पहिल्या पानावर पूर्ण पान..आणि सर्वच वृत्तपत्रांना..अगदी "सामना'सुद्धा. शिंदे उदार आहेतच.... पेपरवाल्यांमध्ये तरी कोणीच नाराज नको...मिडिया खूष..पेपरवाल्यांना तर शिंदे सरकार पर्वणीच ठरली आहे.या व्यवसायात आयुष्य घालवले आहे..त्यामुळे थोडीशी माहिती आहे... पहिल्या "गतिमान' पानाचे दर ..... मग थोडी गती कमी झालेल्या दोन नंबर पानावर आणि नंतर तीन नंबर पान.... मग बातमी वाचायची सुरुवात पान नंबर तीन किंवा चार.... मग तिथेही बातम्या काय...? याला धमकी... त्याला धमकी... या पाच मंत्र्यांना काढाचा आदेश... मग मंत्रीमंडळ विस्तार... राजकीय बातम्यांनी वाचक कंटाळून गेला... त्याचे प्रश्न इतक्या ऐरणीवर आलेले आहेत की, ते कोणते प्रश्न आहेत.... हे समजण्याच्या पलिकडे सरकार निघून गेले आहे,... असं वातावरण महाराष्ट्रात कधीच नव्हते.

महाराष्ट्रातील नगरपालिका आणि महापालिका निवडणुका, मे २०२४ मधील लोकसभा निवडणूक आणि ऑक्टोबरमधील विधानसभा निवडणूक,यापैकी कोणत्याही निवडणुकीचा काही पत्ता नाही. लोकसभा निवडणुका झाल्याशिवाय महापालिकेच्या निवडणुका तर होणारच नाहीत.लोकसभेच्या बरोबर विधानसभेची निवडणूक होऊ शकेल... पण, लोकसभेची निवडणूक मे महिन्यात होईलच, हेही कोणाला ठामपणे सांगता येणार नाही.कारण राजकारण आता एवढे निसरडे आहे की, आजचं उद्या खोटं ठरतं...आणि उद्याचं परवा भलतच काहीतरी होऊन जातं...

या सगळ्या मनस्तापात थोडासा तणाव कमी व्हावा म्हणून आणि विरंगुळा व्हावा म्हणून एक छान जाहिरात आली...सर्वच वृत्तपत्रांत पहिल्या पानावर प्रसिद्ध झाली. शिंदे शिवसेनेच्या वतीने ती जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली. त्यात महाराष्ट्रातील जनतेचे खूप-खूप आभार मानले आहेत. जाहिरातचे शिर्षक इतकं मोठं आहे की, निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर "अमूक विजयी आणि तमूक विजयी',अशी जशी हेडलाईन असते...तशा थाटात ती जाहिरात आहे."राष्ट्रामध्ये मोदी....महाराष्ट्रात शिंदे' एखाद्याला वाटेल निवडणूक कालच झाली आणि आजच निकाल लागला..... अर्थात ही जाहिरात ज्या कोणाच्या सुपिक डोक्यातून निघाली... (प्रसिद्धीपूर्वी ती छापण्याला मंजुरी घेण्यातच आलीच असेल...) त्या माणसाच्या सुपिक डोक्याची कमाल आहे... इंग्रजी किंवा मराठी वृत्तपत्राने हा माणूस शोधून काढून त्याला भल्या मोठ्या पगारावर त्यांच्या त्यांच्या वृत्तपत्राचा जाहिरातप्रमुख म्हणून ताबडतोब घेवून टाकावे.जाहिरात वाचल्यानंतर ताण-तणाव असलेल्या महाराष्ट्राला एकदम हलकं वाटलं... कारण जाहिरातीतच सांगून टाकले आहे की, एका नागरिक पाहणीत असा कौल मिळाला आहे की, भारतीय जनता पक्षाला ३०.०२ टक्के लोकांनी पसंती दिली आहे. आणि शिंदे शिवसेनेला १६.०२ टक्के लोकांनी पसंती दिली आहे. या दोघांची एकत्रित मतं ४६.०४ टक्के आहेत. खाली आणखीन एक मस्त मजा आहे... काय डोकं आहे त्या माणसांच.... एकनाथ शिंदे यांना महाराष्ट्रातील जनतेला मुख्यमंत्रीपदी पुन्हा आणायचे आहे आणि त्याला महाराष्ट्रातील २६.०१ टक्के लोकांची पसंती मिळालेली आहे.त्यापुढे आणखीन एक मजा आहे... देवेंद्रजी फडणवीस यांना २३.०२ टक्के मतदारांनी मुख्यमंत्रीपद देवून टाकलेले आहे. या दोघांची एकत्रित बेरिज करून ४९.०३ दाखवलेली आहे. त्याचे दोन वेगळे अर्थ आहेत.१) एकनाथ शिंदे यांना महाराष्ट्रातील ७४.९९% मतदारांनी मुख्यमंत्रीपदासाठी पसंती नाकारलेली आहे.... २) "मीच पुन्हा येईन...' असा छान राजकीय संदेश नेहमी देणारे बिचारे देवेंद्र फडणवीस यांना ७६.९८% मतदारांनी मुख्यमंत्रीपदासाठी पसंती नाकारलेली आहे. जाहिरातीत दोघांच्या मुख्यमंत्रीपदाची बेरिज करून ती ४९.०३ % अशी दाखवली आहे. म्हणजे राहिलेल्या ४९.०७% लोकांनी दोघांनाही नापसंती दिली आहे.ज्यांचे गणित कच्चे आहे, त्यांनासुद्धा हे गणित पटकन समजून आले. मुख्यमंत्र्यासोबत कोल्हापूरला दौऱ्यावर निघणारे देवेंद्र फडणवीस यांनी सकाळी लवकर उठून... तयार होऊन चहा घेता घेता पहिल्या पानावरची जाहिरात बघितली आणि त्यांची तब्बेत बिघडली, अशी जोरदार बातमी सगळीकडे पसरली. त्यांनी कोल्हापूरला जाणे रद्द करून टाकले. त्याची कारणं दोन असावीत..

एक तर मुख्यमंत्रीपदाच्या परिक्षेत फडणवीसांपेक्षा एकनाथ शिंदे यांना २.०९ टक्के लोकांनी अधिक पसंती दाखवली आहे. त्यामुळे "पुन्हा मीच येईन' मध्ये ही दोन टक्क्यांची अडचण येवून उभी राहिली! आता हा दोन टक्क्यांचा फरक पंतप्रधान मोदीसाहेब किंवा अमित शहा हे भरून काढतील... एवढी एकच आशा आहे. तसं झालं तर मग शिंदेसाहेबांचे काय? असाही प्रश्न आहे. जाहिरात तयार करणाऱ्याने सगळ्या महाष्ट्रालाच चक्रावून टाकलेले नाही तर, मोदी-शहा हे सुद्धा इतक्या जबरदस्त डोक्याच्या माणसाचं कौतुक करत असतील... आजपर्यंत अनेक पक्षांत सल्लागार म्हणून काम करणारे प्रशांत किशोर यांचा दबदबा होता... ते कधी काँग्रेसकडे जायचे... कधी दुसऱ्या पक्षांना सल्ला द्यायचे.... ममता बॅनर्जी यांच्याकडेही ते सल्लागार म्हणून होते... फुटबॉल हातात घेवून प्रचारसभेला जा... हा त्यांचाच सल्ला होता. पण, हे सगळे सल्ले या जाहिरातवाल्याच्या डोक्यापुढं काहीच नाहीत.... त्यामुळे संबंध महाराष्ट्रात अशी काही खळबळ झाली की, दुसऱ्या दिवशी लगेच झी टीव्हीचा आधार घेवून जनेतेच्या चरणी माथा टेकला गेला... आणि महाराष्ट्राचा जयजयकार करून जनतेच्या मनातील महायुतीचे आपले सरकार, अशी जाहिरात झळकली... वरच्या रांगेत मोदी- शहा- बाळासाहेब ठाकरे-आनंद दिघे यांचे फोटो आणि खालच्या रांगेत भाजपाच्या एकाही मंत्र्याचा फोटो नाही.. ज्या पाच मंत्र्यांना काढा... मग मत्रिमंडळाचा विस्ताराची परवानगी, अशा अमित शहा यांच्या नावाने ज्या बातम्या आल्या त्या पाच मंत्र्यांसकट शिंदे गटाच्या नऊच्या नऊ मंत्र्यांचे फोटो.... आता शिंदे यांच्या मंत्रिमंडळात जे भाजपाचे मंत्री आहेत, त्यांना क्षणभर असे वाटेल की, आपल्याला वगळून टाकले की काय...! म्हणून त्यांनी धडाधड फडणवीस यांना फोन लावले... आता पुन्हा दोन दिवसांत सगळ्या मंत्र्यांच्या छायाचित्रासह जाहिरात येवू शकते... भाजपामधील कुणीतरी चाणाक्याने तसाही सल्ला दिला असेल.... गतिमान सरकारला रोज एक पानभर जाहिरात द्यायची अशी काही सवय झाली आहे.... की, आता सकाळी उठल्यावर सरकारची "गतिमान' जाहिरात जर नसेल तर अनेक मंत्र्यांना चहाचा घोट घेणे कठीण होऊन बसले आहे....

बाकी महाराष्ट्राचे ढीगभर प्रश्न कोणते का असेनात.... आणि ते किती काळ पडलेले असेनात... जाहिरात आणि घोषणाबाजी या दोन मुद्यांवर सरकार आणता येईल, अशी खात्री वाटल्यामुळेच सुपिक डोक्यांना हाताशी धरले गेले आहे. खरिपाच्या हंगामाची तयारी कृषीमंत्र्यांकडून एप्रिलपासून सुरू होते. विभागवार बैठका होतात.कृषीमंत्री आणि कृषी अधिकारी यांच्याकडून दोन महिने आधी पूर्ण आराखडा तयार केला जातो. पाऊस लांबला आहे... पण, ७ जून हा मृग नक्षत्राचा ठरलेला दिवस. त्या दिवसापासून पावसाची अपेक्षा... एप्रिल, मे ऐवजी खरिप हंगामाची चर्चा महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात १३ जूनला झाली. सरकारच्या "गतिमान' जाहिरातीचाहा एवढा परिणाम फारच गमतीचा वाटला. कृषीमंत्र्यांनाच त्याची काही माहिती नाही. आणि जाहिरात, उद्घाटने, देवदर्शने यामध्ये सरकारला वेळ नाही. अशी सगळी महाराष्ट्राची आजची दैना असताना मतदानाच्या टक्केवारीचे वाटपसुद्धा होवून गेलेले आहे. प्रसिद्ध झालेल्या टक्केवारीप्रमाणे मोदीसाहेब पंतप्रधान होणार, हे ठरून गेले आहे. शिंदेसाहेब मुख्यमंत्री होणार, हे ठरलेले आहे... आता अमित शहा आणि फडणवीस या दोघांचाच प्रश्न शिल्लक आहे... बाकी लोकांच्या प्रश्नाबद्दल जाहिरातीत कधी चर्चा होत नसते... एकूण ही धमाल जाहिरात आहे.

वृत्तपत्रांतील जाहिरात तयार करणाऱ्या सुपिक डोक्याला "महाराष्ट्र-भूषण' पुरस्कार द्यायला काहीच हरकत नाही. बाकी कोणाला दिला नाहीत तरी चालेल... पण, अशी जाहिरात आजपर्यंत कुणी करु शकले नाही. या विक्रमाबद्दल त्याचा सन्मान व्हायलाच पाहिजे. आणि तो सन्मान "महाराष्ट्र-भूषण' या पुरस्काराखेरिज कशाने होणार आहे?

मधुकर भावे ९८९२०३३४५८

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

अखिल भारतीय मातंग परिषदेचे पहिले अधिवेशन



सतीश जामोदकर
हिवरा बु.मानोरा, वाशिम मो.९४२३३७४६७८

बहुजन समाजाला चार्वाक, गौतम बुद्ध, कबीर, संत रविदास, संत तुकाराम यांच्या विचारांचा वारसा आहे. त्याचप्रमाणे मातंग समाजाला क्रांतीवीर उस्ताद लहुजी साळवे, मुक्ताबाई साळवे, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांचा वैचारिक वारसा आहे. क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्यावर वस्ताद लहुजी साळवे यांचा प्रभाव होता. महात्मा जोतीराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी काढलेल्या शाळेत एक भांग समाजाची विद्यार्थिनी होती. तिचे नाव मुक्ता हिने वयाच्या अवघ्या चौदाच्या वर्षी मांग-महाराच्या दुःखाविषयी एक निबंध लिहिला होता. तो १५ फेब्रुवारी १९५४ साली १ मार्च १९५५ च्या ज्ञानोदयाच्या अंकात दोन भागात छापल्या गेला.

त्या घटनेला आज ७० वर्षे होऊन गेलीत. त्या निबंधात मुक्ताने मांडलेले दुःख एकूणच दलित समाजाचे प्रतिनिधीक दुःख होते. ते आजही कायम आहे. तिचे ते क्रांतीकारी विचार आजही विचार करायला व अंतमुर्ख करायला लावणारे आहे.

महात्मा जोतीराव फुले यांनी २४ सप्टेंबर १८७३ ला सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या समाजाच्या कार्यामुळे ब्राम्हणी व्यवस्था हादरली होती. सत्यशोधक समाजाच्या कामाला वेग मिळाला होता. महात्मा जोतीराव फुलेंच्या निधनानंतर समाजाची धुरा सावित्रीबाईंनी खांदयावर घेतली. त्याचप्रमाणे कृष्णराव भालेकर, नारायण मेघाजी लोखंडे, शास्त्री डुंबरे पाटील, महाघट, पुढील पीढीत भास्करराव जाधव, लठ्ठे व दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांच्यामार्फत हा वारसा चालत येतो. तसेच याच चळवळीला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सद्धम्माची चळवळ संबोधली आणि त्यांचा वारसा अण्णाभाऊपयरंत येवून थांबला.

१९०० साली घडलेल्या कोल्हापूर संस्थानमधील राजर्षी शाहूंच्या वेदोक्त प्रकरणाचे पडसाद सर्वत्र उमटू लागले. या प्रकरणामुळे ब्राम्हणेत्तर समाज मोठ्या प्रमाणात जागृत झाला. राजर्षी शाहू महारांच्या प्रेरणेमुळे भास्करराव जाधव, अन्नासाहेब लठ्ठे, प्रो.डोंगरे यांनी पुनशचः एकदा सत्यशोधक समाजाच्या विचारांची व कार्याची आवश्यकता लक्षात घेऊन सर्व समाजातील परिवर्तनवादी विचारांचा वारसांना जमवून १९११ साली पुण्यास सत्यशोधक परिषद समय्या व्यंकय्या अय्यावारू यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

तत्पुर्वी हाच विचार थोड्या फार प्रमाणात स्विकारुन जातीय परिषदा सुद्धा होवू लागल्या होत्या. त्यामध्ये १९०७ साली मराठा शिक्षण परिषद संघटीत झाली. तर १९१० साली माळी शिक्षण परिषद व भंडारी शिक्षण परिषद जन्मास आली. आर्य क्षत्रीय (जिनगर) ज्ञानवर्धक समाज १९१५ ला परिषदा भरवू लागला. त्याचवेळी धनगर समाज रामोशी समाज परिषद होऊ लागलेत. नामदेव समाजोन्नमती परिषदही याच दरम्यान होवू लागल्या. १९१० मध्ये माळी समाज परिषदा १९२० ला परिषदांच्या परिषद तर १९२२ ला अखिल भारतीय मातंग परिषदेचे पहिले अधिवेशन भरले. १९२५ ला न्हावी समाज परिषदा, १९३० पासून महार समाजाने परिषदा घेतल्या. त्याचबरोबर कुंभार, सुतार समाज सुद्धा परिषदा भरविण्यास सज्ज होत होत्या. या परिषदांमागे महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा होती. परिषदामधील विचारधारा पूर्णपणे परिवर्तनवादी नसली तरी ती समाजाच्या विकासासाठी पोषक होती.

अशाप्रकारे १९१० ते १९३० पर्यंतचा काळ मुख्यतः जातीय परिषदांनी गाजविला होता. ब्राम्हणेत्तर समाज याच काळामध्ये शैक्षणिक, धार्मिक, समाजिक व राजकीयदृष्ट्या जागृत होत होता. प्रत्येक जातीच्या परिषदांचे स्वरूप सामाजिक संघटन होते तर उत्तरार्धात ते राजकीय झाल्याचे दिसून येते. मुकुंदराव पाटील, तरवडी जि. अहमदनगर हे दीनमित्र या सत्यशोधकी पत्रांचे संपादक होते. त्यांच्या साप्ताहिकपत्रात अनेक जातीय परिषदेचे वृत्तांत वाचावयास मिळतात. त्यात मातंग समाजाच्या पहिल्या अधिवेशनाचे वृत्तांत आहे ते येणेप्रमाणे.

दीनमित्र ता.२१ माहे फेब्रुवारी सन १९२३ च्या पत्रात के.के.सकट (कोंडीराम कासीराम सकट, अ.भा. मातंग परिषदेचे सेक्रेटरी) याजकडून प्रकाशीत मजकूर असा.

पहिली मातंग परिषदेची बैठक मुक्काम तारगाव, जि.सातारा येथे तारीख ११/१२/१९२२ रोजी पुणे येथील मातंग लोकाचे सुप्रसिद्ध पुढारी श्रीयूत बाबुराव धोंढीबा धामदंडे यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या थाटाने पार पडली. परिषदेला जवळ-जवळ ६०/५० गावची मातंग व इतर बहिष्कृत मंडळी होती. अल्पावधीत सदर परिषद भरवून आणण्याच्या कामी रा.कुळकर्णी वकील, सौ. विद्यादेवी सावित्रीबाई शेंडे रा. सूर्यवंशी फौजदार, मे.गणपतराव, राणुजी लोखंडे रा. मात्याबन शेंडे रा. तात्यासाहेब नाथुजी गायकवाड, रा. दादासाहेब कृष्णाजी बडेकर व इतर गावातील मंडळीने अत्यंत परिश्रम घेत त्याबद्दल सदर मंडळी अभिनंदनास पात्र आहे.

या परिषदेत झालेले ठराव खालीलप्रमाणे

१) सरकारने निदान बहिष्कृत वर्गाच्या मुला-मुलींकरिता मोफत शिक्षण २) मेलेल्या जनावराचे मांस खाने गुन्हा समजला जावा ३) हजेरी दयावी लागत आहे ती सरकारने माफ करावे ४) मांग व रामोशी लोकांची वसाहत करु नये ५) रा. शंकर गणेश लवाटे यांचा तीव्र निषेध शेवटी हारतुरे होवून कोल्हापूरच्या महाराजांच्या जयजयकाराने परिषदेचे काम संपले.

वरील ठरावानुसार मातंग समाजाला शिक्षणाचे महत्व कळले होते. हे सर्व विविध ब्राम्हणेत्तर जातींना जसे शिक्षणाचे महत्व कळून त्यांच्या परिषदा होत होत्या. त्याप्रभावाचा हा भाग होता असे म्हणावे लागेल.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी बहिष्कृत वर्गाची चळवळ हाती घेतल्यानंतर व माणगाव (कामठा) नागपूर येथील परिषदानंतर बहिष्कृत वर्गात नवी चेतना निर्माण होवून तो जागृत होत होता. ब्राम्हणी व्यवस्थेच्या विरुद्ध लढा देण्यास सज्ज झाला होता.तरीही आंबेडकरांच्या चळवळीकडे स्वतःला हिंदू म्हणावून घेणारा मातंग फारसा आकृष्ट होत नव्हता. थोड्यफार प्रमाणात काही सुशिक्षीत वर्गात जागृती होत होती. विचाराने कम्युनिस्ट असलेल्या अण्णाभाऊ साठे यांनी आपली नाळ आंबेडकरी विचारांशी जोडली. व समाजक्रांतीचे रणशिंग फुंकले. कथा-कादंबऱ्या व शाहीरीच्या माध्यमातून समाजाचे (फक्त मातंग नव्हे) एकूणच वास्तव जीवन लोकांपुढे मांडून त्यांच्या दुःखाला वाचा फोडली.

आजही मातंम समाजा खेड्यापाड्यात गावकुसाबाहेर वस्ती करुन राहत आहे. गावगाड्यात असणारी त्यांची छोटीशी संख्या त्यांना इतरांच्या पुढे नतमस्तक व्हायला लावते. तेही स्वतःला हिंदू म्हणवून घेतात. परंतु आजही त्यांचा नवरदेव पारावर जावू शकत नाही गेलाच तर रक्ताचे पाट वाहतात. तरीही मातंग समाज दैव-दैववादातून बाहेर पडण्यास तयार नाही.

जे नवबौद्ध झाले तेही त्यांना आपल्याबरोबर घेण्यास तयार नाही. परिणामी हा समाज धड हिंदूही नाही बौद्ध ही नाही. अशा बिकट अवस्थेत दिसून येतो. बौद्धांनी धम्माची चळवळ अशा अनेक बहिष्कृत जातीपर्यंत पोहोचविणे काळाची गरज आहे. आज काही मातंग समाजाची मंडळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी जो भगवान तथागतांचा धम्म स्विकारला त्या धम्माकडे वाटचाल करीत आहे. (अर्थात मुळ घर त्यांचे तेच आहे) हे स्वागतर्ह आहे. तसेच परिवर्तनाच्या दिशेचे एक क्रांतीकारी पाऊल ठरेल असेच म्हणावे लागेल. असे झाल्यास मातंग समाजाच्या दृष्टीने तो सुदैव असेल.

स्वतंत्र पावती मिळत नसली तरी सातबारावरच असतो शुल्कविवरण

सातबारा प्रमाणपत्राकरीता मोजावे लागतात १५ रुपये



गोंदिया:- महाराष्ट्र सरकारच्या महसूल विभागाने सातबारा उताऱ्यात प्रमुख ११ बदल केले आहेत. जवळपास ५० वर्षांनंतर सातबारा उताऱ्यात बदल करण्यात आले आहेत. हा नवीन स्वरुपातला सातबारा उतारा महसूल दिनापासून (१ ऑगस्ट २०२१) सामान्य जनतेला उपलब्ध करुन देण्यात आला आहे. हा सातबारा उतारा काढण्यासाठी तलाठी कार्यालयात खेटे घालण्याची गरज आत्ता राहिलेली नाही. ऑनलाईन पद्धतीने डिजिटल स्वाक्षरीचा सातबारा घरबसल्या काढला जाऊ शकतो आणि तो सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी वापरताही येतो. गोंदिया जिल्ह्यातील सर्वच तलाठी कार्यालयातून सातबारा आनलाईन करण्यात आले आहेत. याकरीता मात्र १५ रुपये शुल्क हे ऑनलाईनच भरावे लागत असून त्या १५ रुपयाची स्वतंत्र अशी पावती मिळत नाही. मात्र प्रिंट निघालेल्या सातबारावरच त्या १५ रुपयाचा उल्लेख बघावयास मिळतो.

जमीनीसंबंधीचे रेकॉर्ड कमीत कमी शब्दात व विशिष्ट नमुन्यात ठेवल्याखेरीज सर्वांना समजणार नाही व त्यातील बदल कळणार नाहीत. म्हणून राज्यातील गावांची महसूली माहिती ही, गांव नमुना क्र.१ ते २१ या नमुन्यांमध्ये ठेवली जाते. त्यातील ७ नंबरचा नमुना मालकी हक्काबाबतचा आहे तर १२ नंबरचा नमुना पिकासंबंधीचा आहे. या दोन्हींचा मिळून ७/१२ चा नमुना प्रस्तावित करण्यांत आला.

७/१२ उतारा हा जोपर्यंत बेकायदेशीर ठरविला जात नाही, तोपर्यंत तो कायदेशीर आहे असेच मानले जाते. त्यामुळे तो मालकी हक्कासंदर्भात प्राथमिक पुरावा म्हणून मानलो जातो. शेतीवरील पीककर्जासह इतर कामाकरीता सातबाराचा वापर केला जातो. आनलाईन सातबारा काढल्यानंतरही डिजीटल स्वाक्षरी असली तरीही बँका कर्ज देतांना तो सातबारा ग्राह्य धरत नसल्यामुळे प्रमाणित करुन घेण्यासाठी शेतकरीसह सर्वांनाच तलाठी कार्यालयाचे उबंरठे झिजवावे लागतात. एकीकडे डीजीटलायझेनशला सरकार महत्व देत असतानाच सातबारा कर्ज व जमीनीच्या विक्रीखरेदीच्यावेळी प्रमाणित केल्याशिवाय चालत नाही ही एक मूळ समस्या आजही कायमच आहे.

नवेगाव अभयारण्य पर्यटकांच्या गर्दीने झाले हाऊसफुल

गोंदिया: जिल्ह्यातील सडक अर्जुनी तालुक्यात येणारे नवेगाव अभयारण्यात उन्हाळ्यात वन्यप्राण्यांचे दर्शन होत असल्याने उन्हाळ्याचे तीन महिने वन पर्यटनाचा हंगाम असे म्हणता येते. यामुळेच नवेगाव अभयारण्यात सध्या जंगल सफारीसाठी पर्यटकांची गदी वाढल्याचे दिसत असून, अभयारण्य पर्यटकांनी हाऊसफुल्लम झाले आहे.

तलावांचा जिल्हा म्हणून प्रसिद्ध असलेल्या भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांच्या मधोमध असलेले नागझिरा अभयारण्य नवेगाव राष्ट्रीय उद्यान १३३.८८० चौरस किमी, नवेगाव वन्यजीव अभयारण्य १२२.७५६ चौरस किमी, नागझिरा वन्यजीव अभयारण्य १५२.८१० चौरस किमी, नवीन नागझिरा अभयारण्य १५१.३३५ चौरस किमी आणि कोका वन्यजीव अभयारण्य ९७.६२४ चौरस किमी क्षेत्र मिळून तयार झाले आहे. यात बकी गवत कुरण ५६ हेक्टर आर क्षेत्रात, कालीमाती गवत कुरण ६८ हेक्टर आर क्षेत्रात तर कवलेवाडा गवत कुरण हे १०० हेक्टर क्षेत्रात व्यापले आहे. सध्या उन्हाळा सुरू असून, मोठ्या प्रमाणात वन्यप्राण्यांचे दर्शन पर्यटकांना होत असल्याने नवेगाव अभयारण्यात सध्या चांगलीच गदी वाढली आहे. सडक-अर्जुनी तालुक्यालगत असलेल्या नवेगाव अभयारण्यात जाण्यासाठी खोली गेट, बकी गेट आणि जांभळी गेट सुरू आहेत. येथून सकाळ फेरीत आणि दुपारच्या फेरीत पर्यटकांची गर्दी वाढलेली दिसत आहे.

१ जुलैपासून जंगल सफारी होणार बंद

उन्हाळ्याच्या दिवसात जंगल सफारीचा हंगामच असतो. मात्र, पाऊस सुरू झाल्यानंतर जंगलात पर्यटकांना प्रवेशबंदी केली जाते व जंगल सफारी बंद होते. पावसाळा प्रजननाचा काळ असून, पावसामुळे आतील रस्तेही खराब होतात. अशात पर्यटकांसाठी प्रवेश बंद केले जाते.

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ लगत असलेल्या बकी गेटमधून आत पर्यटनासाठी गेले असता, नीलगाय, सांबर, चितळ, अस्वल, बिबट, रानकुत्रे, चौसिंगा, मोर, रानडुक्कर, भेडकी, वाघ इत्यादी प्राणी हमखास पाहायला मिळतात. बकी गेटमधून आत निसर्गाचा आनंद घेत असताना जांभूळझरी, बदबदा, तेलनझरी, गोपीचूहा, आगेझरी, थाटरेमारी, सालाई झरी असे विविध नैसर्गिक व कृत्रिम झरे पाहायला मिळतात. बकी गेट येथे वनरक्षक अनिता शहारे तर खोली गेट येथे वनरक्षक सोनाली मेश्राम या कार्यरत आहेत.

पर्यटकांना पर्यटनाची इत्यंभूत माहिती देण्यासाठी प्रशिक्षित गाईडची सुविधा केली आहे. नवेगाव अभयारण्यात काळीमाती, टिके जॉईंट, रांजीटोक असे आकर्षक कॅम्प तयार करण्यात आले आहेत. सध्या वाघाचे दर्शन होत असल्याने तिन्ही गेट हाऊसफुल्ल सुरू असल्याचे चित्र नवेगाव अभयारण्यात पाहायला मिळत आहे.

पोलीस ठाणे गोंदिया शहर येथे जनजागृतीपर आरोग्य शिबीर कार्यक्रमाचे आयोजन

गोंदिया: जिल्हा पोलीस दलातील, तसेच पोलीस ठाणें गोंदिया शहर, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय गोंदिया, पोलीस ठाणे रामनगर येथे कार्यरत पोलीस अधिकारी आणि अंमलदार व त्यांचे कुटुंबीयाकरिता होप हॉस्पीटल गोंदिया यांच्या वतीने पोलीस ठाणे गोंदिया शहर येथे पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक अशोक बनकर, उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील ताजने, यांचे मार्गदर्शनाखाली सीपीआर जनजागृती आरोग्य शिबीर प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

आरोग्य शिबीर कार्यक्रमात प्रमुख वक्ते डॉ. प्रमेश गायधने यांनी संबोधित करुन हृदयरोग ही एक प्रमुख आरोग्य समस्या असुन वेगाने पसरत जाणारा रोग आहे. दरवषी हॉर्ट अटॅक मुळे हजारो लोक मृत्यु पावतात. त्याकरिता सीपीआर देण्याची एक विशिष्ट पध्दत असते. जिचा वापर करुन अनेकांचा जीव वाचवता येऊ शकतो. सीपीआर देण्यासाठी कुठल्याही प्रकारची इंजेक्शन किंवा औषधांची गरज भासत नाही. ज्या व्यक्तिची हृदयाची गती मंदावली आहे, ती पुर्ववत होईपर्यंत छातीवर दाब दिला जातो. यामुळे शरिरातील रक्तप्रवाह सामान्य होण्यास मदत होते. सीपीआर ची गरज आहे किंवा नाही हे लक्षात घेणे आवश्यक आहे. सीपीआर ही साधीसोपी आपात्कालीन उचपार प्रक्रिया आहे, मात्र त्यासाठी बेसिक प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. अशा परिस्थतीमध्ये त्याचा वापर कसा करावा व सीपीआर कसा दयायाचा याबाबत त्यांनी उपस्थितांना अतुलनीय असे योग्य उदाहरण दिले.

त्याचप्रमाणे विज्ञान प्रगत झाल्याने आता हॉर्ट अटॅक पासुन वाचवणारे उपचारही आले आहेत. हृदयरोगामुळे आपल्या शरीरास कुठ कुठले दुष्परिणाम होतात, ते टाळण्यासाठी आपण काय गोष्टी लक्षात ठेवले पाहिजे याबाबत माहिती सांगुन शरीर निरोगी राहण्याकरिता सखोल असे अत्यंत मोलाचे मार्गदर्शन दिले.

आयोजीत आरोग्य शिबीर प्रशिक्षण कार्यक्रमाला पोलीस ठाणे गोंदिया शहर येथील पोलीस निरीक्षक, चंद्रकांत सुर्यवंशी, सहा. पोलीस निरीक्षक रामभाऊ होन्डे, पोउपन

पांगोलीच्या अस्तित्वासाठी केंद्राकडे आस

वर्षातून तीनच महिने असते पाणी : खोलीकरणाचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे

गोंदिया: गोरेगाव, गोंदिया आणि आमगाव तालुक्यातील १०० पेक्षा अधिक गावांसाठी पांगोली नदी जीवनदायीनी आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून नदीचे पात्र अरुंद झाले आहेत. ठिकठिकाणी झुडपे वाढली. अनेक ठिकाणी नदीच्या पात्रांत अतीक्रमण झाले. त्यामुळे नदीचे अस्तित्व धोक्यात आले. वर्षातून केवळ तीन महिनेच नदीत पाणी असते. नदीला पुनर्जिवीत करण्याची मागणी होत आहे. जिल्हा प्रशासनाने देखील खोलीकरणाचा प्रस्ताव तयार केला. तो प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे. मात्र अद्यापही खोलीकरणाला मंजुरी मिळाली नसल्याने नदीला गतवैभवासाठी पुन्हा किती वाट बघावी लागणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

पांगोली नदीचा उगम गोरेगाव तालुक्यातील तेढा या गावातून झाला. या नदीत पूर्वी बाराही महिने पाणी राहत होते. गोरेगाव, गोंदिया आणि आमगाव तालुक्यातील शंभरावर गावे या नदीच्या पाण्यामुळे समृद्ध झाली होती. ही नदी मध्यप्रदेशाच्या सिमेवर असलेल्या वाघ नदीला जावून मिळते.

पांगोली नदीला गोंदिया जिल्ह्यातील जीवनदायीनी म्हणून देखील संबोधण्यात येते. मात्र गेल्या काही वर्षांपासून नदीच्या पात्रांचे खोलीकरण करण्यात आले नाही. ठिकठिकाणी झालेले अतीक्रमण, जलपर्णी वनस्पतीचे वाढलेले प्रस्थ आणि वाढलेली झुडपे तसेच उथळ झालेले पात्र यामुळे नदीत पाणी राहत नाही. केवळ पावसाळ्यातील तीन महिनेच या नदीच्या पात्रांत पाणी राहते. त्यानंतर नदी कोरडी पडते. परिणामी नदीचे अस्तित्वच आता धोक्यात आले आहे. गेल्या काही वर्षांपासून पांगोली नदीच्या संवर्धानाच्या मागणीसाठी काही संस्था झटत आहेत. वारंवार शासन आणि प्रशासनाकडे पाठपुरावा करत आहेत. उथळ झालेल्या नदी पात्रांचे खोलीकरण करुन जागोजागी बंधारे बांधल्यास नदीत बाराही महिने पाणी उपलब्ध राहू शकते. त्याचा लाभ पिण्याकरिता आणि शेतीला देखील होवू शकते.

संस्थांच्या वारंवारच्या पाठपुराव्यामुळे जिल्हा प्रशासनाच्या निर्देशावरुन जल संधारण विभागाने नदी खोलीकरणाचा प्रस्ताव तयार केला. तो केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे. मात्र अद्यापही त्या प्रस्तावाला केंद्र शासनाची मंजुरी मिळाली नाही. परिणामी पांगोलीचे गतवैभव परत आणण्यासाठी पुन्हा किती काळ प्रतीक्षा करावी लागते, हे काळच ठरवणार आहे.

ठिकठिकाणी तस्करांनी पोखरले

पांगोली नदी ज्याप्रमाणे नागरिक, जनावरांची तहाण भागविते. त्याचबरोबर शेतीला सिंचनाकरिता या नदीची मोठी मदत होत होती. परंतु, गेल्या काही वर्षांपासून नदीकाठावर अतिक्रमण झाले. गाळ मोठ्या प्रमाणात साचला आहे. तर अनेक ठिकाणी झुडपे वाढल्यामुळे पाण्याच्या प्रवाहावर त्याचा परिणाम होते. तर वाळू तस्करांनी देखील अनेक ठिकाणी नदीचे पात्र पोखरले आहेत. रात्रंदिवस रेती चोरीमुळे देखील नदीचे सौंदर्य खराब झाले आहे.

पांगोली नदीचे सर्वेक्षण करुन खोलीकरणाचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. मंजुरीकरिता केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला आहे. मंजुरी मिळाल्यानंतर खोलीकरणाच्या कामाला सुरुवात करण्यात येईल.

अनंत जगताप, कार्यकारी अभियंता, गोंदिया.

गोंदिया जिल्ह्याची जीवनदायिनी म्हणून ओळखण्यात येणाऱ्या पांगोली नदीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. नदीची अवस्था खूप वाईट आहे. नदीला पुनर्जिवीत करण्याकरिता खोलीकरण आणि अतिक्रमण करणे गरजेचे आहे. त्याकरिता गेल्या १० वर्षांपासून पाठपुरावा सुरू आहे. शासन, प्रशासनाकडे अनेकदा पत्रव्यवहार करण्यात आला. प्रक्रिया सुरू असल्याचे प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे. सर्व समाजघटकांनी पांगोली नदी वाचविण्यासाठी एकत्र येणे गरजेचे आहे.

तीर्थराज उके, समाजोन्नती बहु. संस्था

गहाळ झालेले ८८ मोबाईल तक्रारकर्त्याला परत

गोंदिया: हातात जग सामावून घेणारी वस्तू म्हणजे मोबाईल. परंतु अत्यावश्यक झालेले मोबाईल कुठे हरविले तर त्यात मन गुरफडून जाते. मोबाईल हरविल्याच्या तक्रारी पोलीस ठाण्यात येऊ लागल्या. परिणामी गोंदिया शहर पोलिसांनी ते गहाळ झालेले मोबाईल विविध ठिकाणातून शोधून मूळ मालकाला दिले. गोंदिया शहर ठाण्याच्या हद्दीतून पळविण्यात आलेले ८० मोबाईल हे तक्रारकर्त्याला परत करण्यात आले.

सन २०२१ पासून २०२३ या तीन वर्षात गोंदिया शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून गहाळ झालेल्या मोबाईल संदर्भात तक्रार गोंदिया शहर पोलीस ठाण्यात करण्यात आल्या आहेत. पोलीस ठाण्यात तक्रारी केल्यानंतर पोलिसांनी तांत्रीक मदतीने तपास करुन विविध कंपन्यांचे ८८ मोबाईल अत्यंत महागडे शोधून ते तक्रारकर्त्यांना परत करण्यात आले. १७ जून रोजी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास गोंदिया शहर पोलीस ठाण्याच्या परिसरात तक्रारकर्त्यांना बोलावून पोलीस अधिक्षक निखील पिंगळे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल ताजने, पोलीस निरीक्षक चंद्रकांत सुर्यवंशी यांनी ते मोबाईल तक्रारकर्त्यांना परत केले.

हे मोबाईल शोधण्यासाठी गोंदिया शहर पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पाटील, अरविंद राऊत, विजय गराड, रामभाऊ होंडे, पोलीस उपनिरीक्षक शरद शैदाने, सहाय्यक फौजदार जागेश्वर उईके, घनश्याम थेर, महिला पोलीस हवालदार रिना चव्हाण, पोलीस हवालदार सुदेश टेंभरे, कवलपालसिंह भाटीया, संतोष भांडारकर, सतीश शेंडे, प्रमोद चव्हाण, ओमेश्वर मेश्राम, दीपक रहांगडाले, पुरुषोत्तम देशमुख, विक्की पराते, करण बारेवार, दिनेश बिसेन, सुभाष सोनवाने, सायबरसेलचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव सीद, दिक्षीत दमाहे, प्रभाकर पालांदूरकर, घनश्याम शेंडे, संजय महारवाडे यांनी मोहीम राबविली होती

आदिवासी क्षेत्रात आ.रहांगडालेच्या हस्ते बांधकामाचे भूमिपूजन

तिरोडा:- मागील ऑगस्ट २०२२ च्या अतिवृष्टीमुळे आदिवासी बहूल गावातील दोन गावांना जोडणाऱ्या रस्त्यांची अत्यंत दुरावस्था झाल्याने नागरिकांना प्रवास करण्यात मोठ्या प्रमाणात अडचण उद्भवत होती. नागरिकांच्या समस्या दूर होण्याकरिता तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांनी राज्याचे आदिवासी विकास मंत्री विजयकुमारी गावित, वित्त व नियोजन मंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पालकमंत्री सुधीर मूनगट्टीवार यांच्याकडे रस्ते दुरुस्तीकरिता मागणी केली असता आदिवासी क्षेत्रातील रस्त्याकरिता १०.०० कोटी रुपयाचा निधी मंजूर करण्यात आला.

यामध्ये सोनेखारी-नवेझरी ३०.०० लक्ष, सोनेखारी कुलपा रस्ता २०.०० लक्ष, सोनेखारी खैरी रस्ता १०.०० लक्ष, नांदलपार लाढरी रस्ता २०.०० लक्ष अशा एकूण ९०.०० लक्ष मंजूर विकासकामांचे

भूमिपूजन तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी प्रामुख्याने प.स. सभापती कुंता पटले, प.स. सदस्य तेजराम चव्हाण, ज्योती टेंभेकर, सोनेखारी सरपंचा दिव्या पटले, नवेझरी सरपंच, महेंद्र भांडारकर, नांदलपार सरपंचा अरुणा परतेती, प्रमोद बांते, जितेंद्र टेंभेकर, दर्शन कुसराम, शिव शेंडे व संबधीत गावातील ग्रा.प.सदस्य व गावकरी उपस्थित होते.

ग्राम पंचायत कार्यालय,कोरंभी

पंचायत समिती अर्जुनी/मोर, जिल्हा-गोंदिया

जाहीर निविदा सुचना (पहिली वेळ) दि.२०/०६/२०२३

ग्रा.प.कोरंभी,ता.अर्जुनी मोर,जि.गोंदिया सर्व इच्छुक कंत्राटदारांना सूचित करण्यात येते की मासिक सभा ठराव क्रमांक.१२/२ दिनांक १९/०५/२०२३अन्वये ग्रामपंचायत कोरंभी येथे जलजिवन मिशन पुनरजोडणी अंतर्गत प्रस्तावित कोरंभी येथे १०० टक्के कार्यात्मक घरगुती नळजोडणी सुधारात्मक पुनरजोडणीची कामे करण्याकरीता मोहरबंद दोन लिफापा पध्दतीने अनूसूची ब-१ प्रमाणे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.सदर निविदा हि दिनांक २८/०६/२०२३ला(शक्य झाल्यास)मासिक सभेत सर्व संबधितासमोर उघडण्यात येईल.निविदेचा तपशील खालीलप्रमाणे

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजित किंमत रु.लाखात	निविदा फार्मची किंमत	निविदेसोबत भरावयाची रक्कम १ टक्के	काम पूर्ण करण्याचा कालावधी महिने	कंत्राटदाराचे वर्ग
१	जलजिवन मिशन पुनरजोडणी अंतर्गत प्रस्तावित ग्रा.प.कोरंभी येथे १००टक्के कार्यात्मक घरगुती नळ जोडणीचे कामे	८४७३५२/-	१०००/-	८४७३/-	६ महिने	योग्य त्या वर्गवारीत

निविदा प्रसिध्दी तपशील-: १)निविदा विक्री व स्विकृती २१/०६/२०२३ ते दि.२७/०६/२०२३ सायं.५.०० वाजेपर्यंत.२)तांत्रिक लिफापा उघडून कागदपत्राची तपासणी-दि.२८/०६/२०२३.३)निविदा उघडणे दिनांक २८/०६/२०२३ दुपारी १२.०० वाजता किंवा ग्रा.प.च्या सोयीनुसार.४)अटी व शर्तीच्या अधीन राहून कंत्राटदारांनी निविदा सादर करावी.५)कंत्राटदारांनी आपल्या फर्मची सर्व दस्तावेज व दरपत्रके अटी व शर्तीप्रमाणे या नोटीसच्या दिनांकापासून ग्रा.प.कार्यालयात दि.२७/०६/२०२३ला दुपारी ठीक ३.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत.६)सदर निविदेत आवश्यकता भासल्यास बदल करण्याचे अधिकार सरपंच ग्रा.प.कोरंभी अंतर्गत राखून ठेवण्यात आलेले आहे.७)निविदेच्या अटी व शर्ती ग्रा.प.च्या नोटीस बोर्डावर बघावयास मिळतील.

ग्रामसेवक
ग्रामपंचायत पंचायत कोरंभी

सरपंच
ग्रामपंचायत पंचायत कोरंभी

ग्राम पंचायत कार्यालय,बोरी

पंचायत समिती सालेकसा, जिल्हा-गोंदिया

निविदा सुचना क्र.१ (पहिली वेळ सन २०२३-२०२४) दि.२०/०६/२०२३

ग्रा.प.कार्यालय बोरी,पंचायत समिती अर्जुनी मोर,जि.प.गोंदिया येथे जिल्हा वार्षिक योजनेच्या सन २०२२-२३ चे निधीतून जि.प.शाळा आसोली येथे नवीन आवारभिंत बांधकाम करणे या कामाकरीता लागणारे साहित्य बांधकामाच्या जागेवर पोहचतेदरानी जीएसटीधारक नोंदणीकृत पुरवठाधारक यांचेकडून मोहरबंद व्दिलिफापा पध्दतीने साहित्य खरेदीच्या निविदा मागविण्यात येत आहेत.निविदेची विस्तृत जाहीरात ग्रा.प.कार्यालय बोरीच्या सूचना फलकावर प्रसिद्द करण्यात आली असून निवेदीतील अटी व शर्तीनुसार इच्छुक जीएसटीधारक नोंदणीकृत पुरवठाधारक यांनी साहित्य खरेदीच्या निविदा सादर कराव्या.साहित्य खरेदी निविदा बंद लिफाफ्यात सादर कराव्यात.त्याशिवाय निविदा स्विकारल्या जाणार नाही.निविदा सोबत १००० रुपये व कोरे निविदा फी सोबत ५०० रुपये भरुन ग्रा.प.कोरंभीच्या नावे द्यावा लागेल.उपरोक्त फी भरल्याशिवाय निविदा स्विकारल्या जाणार नाही.

१	निविदा प्रकाशित दिनांक	दिनांक २१/०६/२०२३
२	कोऱ्या निविदा प्रपत्र रु.फी.५००/-ने भरुन ग्रा.प.कार्यालयातून प्राप्त करणे	दिनांक २१/०६/२०२३ सकाळी ११.०० वाजे पासून दिनांक २७/०६/२०२३ साय.५.वाजेपर्यंत कार्या.वेळेत
३	निविदा दाखल करण्याचा सुरवात दिनांक	दिनांक २१/०६/२०२३
४	निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक	दिनांक २७/०६/२०२३ साय.५.वाजेपर्यंत
५	निविदा उघडण्याचा शक्यतो दिनांक	दिनांक ३०/०६/२०२३

(टिप :- निविदा पत्रकातील सविस्तर माहिती ग्राम पंचायत कार्यालय बोरी येथे कार्यालयीन वेळेत मिळेल.)

ग्रामसेवक
ग्रामपंचायत पंचायत बोरी

सरपंच
ग्रामपंचायत पंचायत बोरी

कार्यालय ग्राम पंचायत झाशीनगर

पंचायत समिती अर्जुनी/मोर जिल्हा परिषद गोंदिया

निविदा सुचना

सर्व इच्छुक कंत्राटदारांना सुचित करण्यात येत आहे की, ग्रामपंचायत झाशीनगरला खालील विवरण पत्राप्रमाणे बांधकाम करावयाचे असुन महाराष्ट्र बांधकाम विभागाकडे यथायोग्यं श्रेणीत नोंदणीकृत असलेल्या इच्छुक कंत्राटदारांकडुन दिनांक २५/०६/२०२३ दुपारी ३.०० वाजे पर्यत व्दीलिफाफा पध्दवतीने निविदा दरपत्रक मागविण्यात येत आहेत.निविदा फार्म प्रक्रियाच्या अनुषंगाने दिनांक २१/०६/२०२३ पासुन ते दिनांक २५/०६/२०२३ पर्यंत निविदा फार्म विक्री कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात सुरू राहील व दुपारी ३.०० वाजे पर्यंतचे कालावधीत कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतील.निविदा बाबतच्या अटी व शर्ती हया ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन उपरोक्तं वेळेत पहावयास मिळेल.

अनु.क्र.	कामाचे नाव	कामाची अंदाजपत्रकीय रक्कम(रु.लाखात)	निविदा फार्म ची किंमत	अनामत रक्कम (१%)	काम पूर्ण करण्याचा कालावधी
१	Repairs of cement cons.Drain at Zashinagar(Dhondu parso to Nilesh parteti house)	1,65,000/-	300/-	1650/-	3 month
2	Repairs of cement cons.Drain at Zashinagar(Rajkumar holi to Hiralal parso house)	1,60,000/-	300/-	1600/-	3 month
3	Paving Block in z.p.school Zashinagar	1,30,000/-	300/-	1300/-	3 month
4	Drainage sludge Remove zashinagar	75,000/-	300/-	750/-	3 month
5	Drainage sludge Remove zashinagar (22-23)	75,000/-	300/-	750/-	3 month
6	Repairs of Bridge Internal Village (cross Drain) Zashinagar	71,000/-	300/-	751/-	3 month
7	Public toilet Zashinagar	3,00,000/-	300/-	3000/-	3 month

सरपंच
ग्राम पंचायत झाशीनगर

ग्रामसेवक
ग्राम पंचायत झाशीनगर

ग्राम पंचायत कार्यालय,बुधेवाडा

पंचायत समिती अर्जुनी/मोर, जिल्हा-गोंदिया

जाहीर निविदा सुचना (पहिली वेळ) दि.१२/०६/२०२३

सर्व इच्छुक कंत्राटदारांना सुचित करण्यात येत आहे की, मासिक सभा ठराव क्रमांक९/५ दिनांक २२/०५/२०२३ अन्वये ग्रामपंचायत बुधेवाडा येथे १५ वित्त आयोग सन २०२२-२३ अंतर्गत प्रस्तावित बुधेवाडा यथे खालील कामे करण्याकरीता मोहरबंद दोन लिफापा पध्दतीने अनुसूची ब-१ प्रमाणे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे.तरी निविदा अर्ज फार्म ग्रामपंचायत येथे दिनांक २१/०६/२०२३ ते दि.२९/०६/२०२३ पर्यंत विक्रीकरीता उपलब्ध आहेत.नमुदकेल्याप्रमाणे अटी व शर्तीच्या अधीन राहून कंत्राटदारांनी आपली निविदा सादर करावी.इच्छुक कंत्राटदारानी आपल्या फर्मची सर्व दस्तावेज व दरपत्रके अटी व शर्तीप्रमाणे या नोटीसच्या दिनाकांपासून ग्रा.प.कार्यालयात दि.२९/०६/२०२३ ला दुपारी ठीक.०३.००वाजेपर्यंत कार्यालयीनी वेळेत सादर करावीत.

काही अडचण असल्यास व अधिक माहितीसाठी ग्रामपंचायत कार्यालयास संपर्क साधावे.(email-budhewadagp@rediffmail.com)सदर निविदा हि मासिक सभेत(शक्य झाल्यास)सर्व संबधितासमोर उघडण्यात येईल.

अ.क्र.	कामाचे नाव	अंदाजित किंमत रु.लाखात	निविदा फार्मची किंमत	निविदेसोबत भरावयाची रक्कम १ टक्के	काम पूर्ण करण्याचा कालावधी महिने	कंत्राटदाराचे वर्ग
१	जी.प.शाळा ग्राऊंड पेव्हर ब्लॉक(गट्टू)	१४००००	६००/-	१४००/-	३ महिने	योग्य त्या वर्गवारीत
२	सिमेंट नाली(बंदिस्त गटारे) परसराम मेश्राम ते मायाराम बावणे	१०००००		१०००/-	३ महिने	योग्य त्या वर्गवारीत
३	सार्वजनिक मुत्रीघर	१०००००		१०००/-	३ महिने	योग्य त्या वर्गवारीत
४	दुरुस्ती ग्रामपंचायत जुनी इमारत (ग्रामसंघ)	१२५०००		१२५०/-	३ महिने	योग्य त्या वर्गवारीत
५	सिमेंट नाली(बंदिस्त गटारे) मनोहर लंजे ते हनुमान मंदीर	१९००००		१९००/-	३ महिने	योग्य त्या वर्गवारीत
६	ग्रामपंचायत कार्यालय सौंदर्यीकरण (बगीचा)	११००००		११००/-	३ महिने	योग्य त्या वर्गवारीत

(टप :- अटी व शर्ती ग्राम पंचायत कार्यालय नोटीसबोर्डावर कार्यालयीन वेळेत बघावयास मिळतील

ग्रामसेवक
ग्रामपंचायत पंचायत बुधेवाडा

सरपंच
ग्रामपंचायत पंचायत बुधेवाडा

जाहीर सुचना

श्री.सुरजपाल व रामअवतार गुप्ता इनके नाम से नगर परिषद रिकार्ड मे नाम दर्ज है।जिसका वार्ड क्रमांक २२ वार्ड का नाम सुखदेव अग्रवाल मालमत्ता क्रमांक ९६६ है।उक्त मालमत्ता धारक का निधन दिनांक १९/०९/२००३ को हो चुका है।इनके निधन उपरांत इनके वारस १) राधाबाई सुरजपाल गुप्ता, २)मोहनलाल सुरजपाल गुप्ता,३) दिलीपकुमार सुरजपाल गुप्ता,४) आशाबाई रमेश गुप्ता इन्होने वारसान आधार पर हस्तांतरण हेतू आवेदन सादर किया है।हस्तांतरण पर आक्षेप हो तो यह सुचना प्रकाशित होने के पश्चात १५ दिन के भितर अपना आक्षेप इस कार्यालय मे प्रमाणित दस्तावेज सहित सादर करेंगे।आक्षेप प्राप्त न होने पर हस्तांतरण की कार्यवाही की जायेंगी।

मुख्य अधिकारी
नगरपरिषद,गोंदिया

कार्यालय कार्यकारी अभियंता

सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, गोंदिया

कार्या.दुरध्वनी क्रमांक ०७१८२-२५००६४

Office e-mail :-egsgondia.ee@mahapwd.gov.in
website :-www.mahapwd.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्र.:-२६३९ /नि.लि./२०२३ दिनांक :-१४/०६/२०२३

ई-निविदा सुचना क्र.०६ (२०२३-२४)

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, गोंदिया हे महाराष्ट्र शासनाचे सा.बां. विभागाकडील योग्यत्या वर्गातील गोंदिया जिल्ह्या अंतर्गत नोंदणीकृत सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांचा करीता खालील कामाकरिता ब-१ नमून्यात निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहे. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

अ.क्र.	कामाचे नांव	अंदाजित किंमत लक्षात
	गोंदिया जिल्ह्या अंतर्गत नोंदणीकृत सुशिक्षीत बेरोजगार अभियंता यांचा करीता	
१	कवलेवाडा सोनेगाव नवरगांव बागडबंद आसलपाणी बोंडूदा रस्ता-प्रजिमा ५९ कि.मी.०.०० ते १९/२०० मध्ये रस्त्याची सुधारणा व वार्षिक देखभाल दुरुस्ती करणे ता.गोरेगाव जि.गोंदिया	रू.२५.७१
२	वडेगाव भजेपार रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरण करणे (प्रजिमा-२८) कि.मी.०.०० ते १०/०० मध्ये रस्त्याची सुधारणा व वार्षिक देखभाल दुरुस्ती ता.तिरोडा जि.गोंदिया	रू.११.७५
३	अर्जुनी खैरलांजी चांदोरी बघोली बोरा सोनेगाव बिबीटोला सेजगाव ते तालुका सिमा रस्त्याचे रूंदीकरणासह मजबूतीकरण व डांबरीकरण करणे (प्रजिमा-२) कि.मी.००/००० ते १९/६०० मध्ये रस्त्याची सुधारणा व वार्षिक देखभाल दुरुस्ती ता.तिरोडा जि.गोंदिया	रू.११.७६
४	फुलचूरटोला डववा कवलेवाडा बोरगाव खाडीपार रस्ता प्रजिमा-५८ कि.मी.०./०० ते ११/०० मध्ये रस्त्याची सुधारणा व वार्षिक देखभाल दुरुस्ती ता.गोरेगाव, जि.गोंदिया	रू.२५.२५
५	महारीटोला किकरीपार किडंगीपार सुरकुडा मानेगाव झान्झिया रस्ता प्रजिमा १८ किमी २४/०० ते २९/७०० मध्ये रस्त्याची सुधारणा व वार्षिक देखभाल दुरुस्ती ता.गोरेगाव जि.गोंदिया	रु.१३.७०

१) ई-निविदा उपलब्ध कालावधी :- As per e-tender schedule on e-portal
इतर अटी उघडणे :- ऑनलाईन नमूद केल्यानुसार वेळापत्रक, रक्कम, स्थळ इ.लागू व अंतिम राहील.
खालील संकेतस्थळावर ई-निविदांची सर्व माहिती उपलब्ध राहील.
२) इतर अटी व शर्ती ई-निविदा नमून्यामध्ये उपलब्ध असून त्यानुसार निविदा सादर करावी. कोणतेही किंवा सर्व निविदा कोणतीही कारण न सांगता अस्विकृत करण्याचे सर्व अधिकार सक्षम प्राधिकरणाकडे राखूव ठेवण्यात आलेले आहे.
३) सदर निविदा सुचनेतील कामासंबंधात कोणताही बदल हा वृत्तपत्रात प्रकाशित केल्या जाणार नाही. निविदा सुचनेतील कामांसंबंधात कोणताही बदल फक्त http://mahatenders.gov.in या साईटवरच प्रकाशित केल्या जाईल. तसेच निविदिधारकांनी बिड लॉक झाल्यानंतर ७२ तासाचे आत निविदे संबंधित कागदपत्रांची (Hard Copy) (Technical Envelope) सिलबंद लिफाफ्यामध्ये निम्न स्वाक्षरीकारांचे कार्यालयात सादर करावे.
४) कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग क्र.१, गोंदिया कार्यालयातील सुचना फलक.

(एन.टी.लभाने)
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१
गोंदिया

क्र.संमावज/नाग/२१०/२०२३

कार्यालय ग्राम पंचायत पवनी/धाबे

पंचायत समिती अर्जुनी/मोर जिल्हा परिषद गोंदिया

निविदा सुचना

सर्व इच्छुक कंत्राटदारांना सुचित करण्यात येत आहे की, ग्रामपंचायत पवनी/धाबे येथे खालील विवरण पत्राप्रमाणे बांधकाम करावयाचे असुन महाराष्ट्र बांधकाम विभागाकडे यथायोग्यं श्रेणीत नोंदणीकृत असलेल्या इच्छुक कंत्राटदारांकडुन दिनांक २५/०६/२०२३ दुपारी ३.०० वाजे पर्यत व्दीलिफाफा पध्दवतीने निविदा दरपत्रक मागविण्यात येत आहेत.निविदा फार्म प्रक्रियाच्या अनुषंगाने दिनांक २१/०६/२०२३ पासुन ते दिनांक २५/०६/२०२३ पर्यंत निविदा फार्म विक्री कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात सुरू राहील व दुपारी ३.०० वाजे पर्यंतचे कालावधीत कार्यालयीन वेळेत स्विकारण्यात येतील.निविदा बाबतच्या अटी व शर्ती हया ग्रामपंचायत कार्यालयात कार्यालयीन उपरोक्तं वेळेत पहावयास मिळेल.

अनु.क्र.	कामाचे नाव	कामाची अंदाजपत्रकीय रक्कम(रु.लाखात)	निविदा फार्म ची किंमत	अनामत रक्कम (१%)	काम पूर्ण करण्याचा कालावधी
१	Installation of solar energy based Dual pump mini water supply scheme on Existing Borewell/Dugwell at Pawani/Dhabhe	209432 /-	500/-	2095/-	3 month
2	Extension of Pipe line to PHC Powni/ Dhabe of solar energy based Dual pump mini water supply scheme on Existing Borewell at Powani/Dhabe	266493/-	500/-	2667/-	3 month

अनामत रक्किम भरल्या ची पावती मिळेल.मोहरबंद निविदा ग्रामपंचायतीच्या लगतच्या मासिकसभेत उघडण्यात येतील.सदर कामाची तपशिलवार संपुर्ण माहिती अटी व शर्तीसह ग्रामपंचायतच्याब नोटिस बोर्डावर प्रसिध्द करण्यायत आलेली आहे.

सरपंच
ग्राम पंचायत पवनी/धाबे

ग्रामसेवक
ग्राम पंचायत पवनी/धाबे

गोंदिया पालिकेला निधी असूनही घनकचरा व्यवस्थापनाकरिता जागा मिळेना

गोंदिया: जिल्हा मुख्यालयातील नगर पालिका "अ' वर्ग दर्जाची आहे. या पालिकेने शंभरी ओलांडली. शहराचा व्याप दिवसेंदिवस वाढत चालला आहे. २०११ च्या जनगणनेनुसार शहराची लोकसंख्या १ लाख ३९ हजार ८१३ इतकी आहे, तर क्षेत्रफळ १८.०८ वर्ग किलोमीटर पर्यंत व्याप पसरला आहे. गोंदिया नगरपालिकेची स्थापना १९२० साली झाली. मात्र, अद्यापही शहरातून दिवसाकाठी निघणाऱ्या ७० मेट्रिक टन कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याकरिता पालिकेकडे स्वतःच्या मालकीचे घन कचरा व्यवस्थापन प्रकल्प नाही.

साधे डम्पिंग यार्ड देखील पालिकेकडे नाही. त्यामुळे मिळेल, त्या ठिकाणी शहरातून निघणारा कचरा टाकण्यात येत आहे. आत्तापर्यंत पालिकेने दहा

स्वच्छतेचा पैसा कंत्राटदारांच्या घशात

शहरातील सर्वात मोठी समस्या कचऱ्याची आहे. घन कचरा व्यवस्थापनाचा निधी येवून देखील जागा मिळत नसल्याचा बहाणा करून त्या निधीतून येणारा व्याज येथील कंत्राटदारांचे पोट भरण्याकरिता वापरण्यात येत असल्याचा आरोप माजी न.प. उपाध्यक्ष व शिवसेना गोंदिया जिल्हाप्रमुख पंकज यादव यांनी केले आहे.

जागा प्रकल्पाकरिता बघण्यात आल्या. मात्र स्थानिकांनी विरोध केल्यामुळे ते देखील फिस्कटले. कधी स्थानिकांचा विरोध, तर कधी विमानतळ प्राधिकरणाची हरकत यामुळे कचऱ्याची समस्या बिकट झाली आहे.

८.७३ कोटी रुपये मंजूर होवून देखील फाइल पुढे सरकायचे नाव घेत नाही. आमदार विनोद अग्रवाल यांनी १६ फेब्रुवारी २०२२ रोजी अधिवेशनात हा मुद्दा उचलून देखील त्याला अद्यापही गती मिळाली नाही. कचऱ्याच्या उकिरड्यावर गोंदिया शहरवासींनी पुन्हा किती दिवस काढावेत, हे अद्याप ही कळण्यापलिकडे झालेले आहे.

जागेचाच अडसर

आपल्या गेल्या कारकिर्दीच्या पाच वर्षांच्या काळात शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न मार्गी लागावा, याकरिता सर्वतोपरी प्रयत्न केले. पालिकेतील सर्व सदस्यांना विश्वासात घेऊन सात ते आठ ठिकाणच्या जागा शोधण्यात आल्या. मात्र ज्याठिकाणी जागा ठरविण्यात करण्यात आली. त्याठिकाणच्या नागरिकांनी आक्षेप प्रसंगी आंदोलन केल्यामुळे तिथे प्रकल्प उभारता आला नाही. शहरात आज घडीला कचऱ्याचे व्यवस्थापन करण्याची नितांत आवश्यकता आहे. काही जागा लक्षात असून त्या जागा मिळविण्यासाठी पालिकेचे अद्यापही प्रयत्न सुरुआहेत. जिल्हा प्रशासनाने यात हस्तक्षेप करून जागा उपलब्ध करून देण्यासाठी सहकार्य करण्याची गरज आहे.

-अशोक इंगळे, माजी नगराध्यक्ष न.प.गोंदिया.

शरणार्थी तिबेटियनच्या भारतातील वास्तव्याला ६४ वर्ष

२०१४ पुनर्वसन कायद्याची अमलबजावणी न झाल्याने अनेक समस्या

गोंदिया: तिबेटच्या एका खेड्याची प्रतिकृती आपल्याला गोंदिया जिल्ह्यातील गोठणगावला निश्चितपणे बघायला मिळू शकते. हे छोटेसे तिबेटी लोकांचे गाव अर्जुनी मोरगाव तालुक्यात आहे. हे तिबेटी लोक निर्वासित असून भारत सरकारच्या मदतीने त्यांच्यासाठी येथे खास वसाहत वसविण्यात आली आहे. सुरुवातीला या वसाहतीचे स्वरुप "तिबेटी कॅम्प' चे होते. आता त्याला एका तिबेटी खेड्याचे स्वरूप प्राप्त झाले असून हे खेडे तिबेटी संस्कृतीचे दर्शन घडविते. मात्र या ६४ वर्षात शासकीय योजनांचा पाहिजे तसा लाभ आजही न मिळाल्याची खंत आणि केंद्रसरकारच्या २०१४ पुनर्वसन कायद्याची महाराष्ट्र सरकारने न केलेल्या अमंलबजावणीमुळे अनेक सोयीसुविधांपासून वंचित राहण्याची वेळ आल्याचे खंत येथील वसाहतीचे व्यवस्थापक दोंदुप सांगपो यांनी व्यक्त केली आहे. चौदावे दलाई लामा तेनजीन ग्यात्सो हे यांचे आध्यात्मिक नेते आहेत. ते तिबेटमध्ये करुणेचे बोधिसत्व व संरक्षक संत अवलोकितेश्वर यांचे अवतार मानले जातात. त्यांना १९८९ मध्ये शांतीचा नोबेल पुरस्कार मिळाला आहे. त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे.

स्वातंत्र्याचा दुर्दम्य आशावाद व नसानसात देशाभिमान भिनलेले ते तिबेटीयन पाहुणे मागील ६४ वर्षांपासून भारतात वास्तव्यास आहेत. अद्याप त्यांनी भारताचे नागरिकत्व स्वीकारले नाही. आज ना उद्या तिबेट स्वतंत्र होईल या प्रतीक्षेत ते आहेत.७ ऑक्टोबर १९५० तिबेटीयनांसाठी काळा दिवस ठरला. ४० हजार चीनी सैनिकांनी थांगत्सी नदी ओलांडून मध्य तिबेटमध्ये प्रवेश केला. छाम्दो येथे सुरक्षा सेनेला पराभूत केले. चीन आक्रमणापूर्वी ६० लाख लोकसंख्या असलेले तिबेट हे स्वतंत्र राष्ट्र म्हणून ओळखले जात होते. चीनद्वारा तिबेटवरील आक्रमणाचा जगात निषेध झाला. परंतु साम्यवादी चीनवर त्यांचा कुठलाही परिणाम झाला नाही. तिबेटीयनांनी केलेली निदर्शने, आंदोलने चीनने दडपून हजारों महिला-पुरुषांना जीवे मारले. हा अन्याय, अत्याचार असह्य झाला.

१७ मार्च १९५९ रोजी चौदावे दलाई लामा यांनी सुमारे ८० हजार लोकांसोबत भारतात शरण घेत वास्तव्यास आले.आजमितीस भारतात तिबेटीयनांची संख्या १ लाख ७० हजार एवढी आहे. जगात राष्ट्रप्रमुखाचा दर्जा प्राप्त दलाई लामांनी हिमाचल राज्याच्या धर्मशाळा येथे निर्वासित तिबेट सरकारचे अधिष्ठान स्थापन केले. भारतात हिमाचल प्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, अरुणाचल प्रदेश, सिक्कीम, छत्तीसगड, ओरीसा व जम्मू कश्मिर या राज्यात एकूण १५ शेतकीप्रधान तर हिमाचल प्रदेश, उत्तराखंड व पश्चिम बंगाल राज्यात १४ ठिकाणी हस्तव्यवसाय व उद्योग प्रधान वसाहती आहेत. दिल्ली, मेघालय, कुल्लू, मुंदुवाडा, सिक्कीम, बोमदीला येथेही विखुरलेल्या वसाहती आहेत.

महाराष्ट्राच्या पूर्व टोकावर गोंदिया जिल्ह्याच्या अर्जुनी-मोरगाव तालुक्यातील गोठणगाव (प्रतापगड) येथे महाराष्ट्रातील एकमेव तिबेटीन वसाहत आहे.नागीलिंग तिबेटीयन असे या वसाहतीचे नाव आहे.१९७२ मध्ये ही वसाहत अस्तित्वात आली. १३० घरांमध्ये १००० लोक गुण्यागोविंदाने नांदत आहेत. सुरुवातीला ते इटियाडोह धरणाच्या शेजारी तंबूत राहू लागले. कालांतराने शासनाने बुटाई नं. १ नजीक या निर्वासितांचे पुनर्वसन केले. २ कुटुंबांना एक घर मिळून २ कॅम्प तयार झाले. शासनाने प्रतिव्यक्ती ६० डिसमिल या प्रमाणे प्रत्येक कुटुंबाला उदरनिर्वाहासाठी शेत जमिन दिली. एकूण ६१२.८० एकर जमिनीत ही वसाहत आहे. यापैकी ४०५ एकर जागार शेतीची आहे. हिमाचलच्या कुलू व डलहौजी पर्वतावर थंड वातावरणात राहणारी ही मंडळी पूर्व विदर्भाच्या उष्ण व दमट वातावरणात आज पुर्णतःवातावरणासोबत जूळलेली आहे.सुरवातीच्या दिवसात उष्णतेच्या काहिलीने त्रस्त झालेले हे लोक दिवसभर इटियाडोह धरणाच्या कालव्यातील पाण्यात बुडून असायचे. भात शेती व स्वेटर विकी हा यांचा मुख्य व्यवसाय आहे. ते कष्टाळू आहेत. या व्यवसायाच्या भरवशावरच वर्षभर ते कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. एकेकाळी येथील गालीचे सर्वदूर प्रसिद्ध होते. मात्र या गालीच्यांना महाराष्ट्रात अत्यल्प मागणी आहे. त्यामुळे हळूहळू हा व्यवसाय मोडकळीस आला.

गोठणगावच्या या वसाहतीत दोन तिबेटी संप्रदायाचे नागरिक राहतात. त्यात "निमा' संप्रदाय प्रमुख समजला जातो त्यांनी वेगळेपण जपले आहे. तिबेटीयन कलेचे दर्शन घडविणारे बौद्ध विहार त्या लोकांनी येथे बनविले असून ते बघण्यासारखे आहे. स्वित्झर्लंडकडून मिळालेल्या मदतीच्या सहाय्याने येथे एक वृद्धाश्रमही सुरू करण्यात आला आहे. स्थानिक पंचायत राज सांभाळणारी सहकारी संस्था, एक विचार संघटना, तिबेटी जडीबुटींचे एक आयुर्वेदिक औषधालय वगैरे येथे आढळून येतात. ज्यामुळे आपल्याला तिबेटीयन संस्कृतीचा परिचय होतो. येथील बौद्ध मंदिरात तिबेटहून आलेले सहा धर्मगुरूवास्तव्यास आहेत. त्यांनी मतदानाचा हक्क घेतलेला नसून तात्पुरत्या रहिवासी पत्रावर ते येथे वास्तव्य करीत आहेत. त्यांच्या कुटुंबातील प्रत्येकी एक सदस्य भारतीय सेनेत आहे.

येथील तिबेटीयन लोक त्यांच्या पारंपरिक वेशभूषेतच दिसून येतात. बरेचसे लोक मंदिरात दर्शनासाठी उपस्थित राहतात. टिपीकली तिबेटीयन आकाराचे, डिझाइन व पेंटिंगचे हा विहारात एक मोठा रोलर असून तो हे लोक गोल गोले फिरवितात. तिबेटी लोकांचा "सुमोर' नावाचा मांसाहारी समोसा व रुचकर शेवयांचा येथे गेल्यावर बघावयास मिळतात. बौद्ध विहारातील मोठमोठे नगारे व लांब आवाजातील मंत्रोच्चारामुळे पवित्र वातावरण येथे तयार झाले आहे.

या वसाहतीमध्ये आज तेथील विद्यार्थ्यांसांठी शिक्षणाची सोय विद्यार्थी संख्या कमी झाल्याने पाचवीपर्यंत आली आहे. तीनवर्षापुर्वीपर्यंत आठवीपर्यंत होती.सेंट्रल तिबेटीयन स्कूल ॲडमिनिस्ट्रेशन नवी दिल्लीच्या कार्यक्षेत्रात.पाचवी उत्तीर्ण केल्यावर दुसऱ्या वसाहतीमध्ये उच्च शिक्षणासाठी पाठवले जाते. येथील लोकांच्या आरोग्याची तपासणी करण्यासाठी आरोग्य केंद्र आहे,जे धर्मशाळेकडून चालविले जाते. त्याचप्रमाणे बहुउद्देशीय तिबेटियन को ऑपरेटिव्ह सोसायटी ही महाराष्ट्र सरकारद्वारा मान्यताप्राप्त आहे. ज्यामाध्यमातून तिबेटीयन सदस्यांना कर्जपुरवठा व शेतीसाठी साहित्य खरेदीकरीता आर्थिक मदत उपलब्ध करुन दिली जाते. तिबेटीयन वसाहतीमधील वृध्दांच्या देखरेखीकरीता एक वृध्दाश्रम सुध्दा याठिकाणी आहे.

परसवाडा-धापेवाडा रस्त्याच्या नुतनीकरणाकरीता साखळी उपोषण आंदोलन

गोंदिया:- जिल्ह्यातील दोन तालुक्यांना जोडणारा मुख्य रस्ता म्हणजे परसवाडा धापेवाडा कुडवा रस्ता होय.परंतु दोन विधानसभा मतदारसंघात विभागलेल्या या रस्त्याच्या दुरुस्तीकडे दोन्ही मतदारसंघातील आमदार दुर्लक्ष करीत असल्याने रस्त्याची दुरावस्था झाली आहे. त्या दुरावस्था झालेल्या रस्त्याच्या नुतणीकरणाच्या मागणीला घेऊन गोंदिया पंचायत समितीचे उपसभापती निरजकुमार उपवंशी यांच्या नेतृत्वात आज १९ जूनपासून साखळी उपोषण आंदोलनाला सुरवात करण्यात आली आहे.

या साखळी उपोषण आंदोलनात डॉ.प्रदीप रोकडे माजी सरपंच धापेवाडा,नागरतन बंसोड गोंदिया, ब्रिजलाल मारगाये सरपंच हिवरा, राजेशसिंग परिहार माजी उपसरपंच हिवरा, ठानिराम माहुले उपसरपंच लोधीटोला, नितीन नागपुरे उपसरपंच मुरदाडा, भोजराज राहांगडाले, तुलसिकुमार बघेले माजी सरपंच लोधीटोला, संतोष उके, रवींद्र मस्करे, मेघनाथ राहांगडाले तं. मु. स. अध्यक्ष लोधीटोला, कृष्णाकुमार ठकरेले, सुरेंद्रकुमार नागपुरे महालगाव, सौ. दिपलता कृष्णाकुमार ठकरेले सरपंच लोधीटोला, कमलेश दमाहे माजी सरपंच महालगाव, धनराज हरिराम दोनोडे माजी उपसरपंच धापेवाडा, शिवलाल गयगये, मागनभाऊ ठाकूर, प्रफुल उके ग्रा. पं. सदस्य लोधीटोला, सुनील कटरे, धर्मेंद्र नागपुरे आदी सहभागी झाले आहेत.

मुंबई उच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय;पोलिसांची कारवाई सुरू असताना नागरिकांना दिला हा अधिकार

नागपूर :- नागरिक म्हणून आपल्याला अनेक अधिकार आहेत, मात्र अनेकवेळा सरकारी कामात ढवळाढवळ करून नागरिकांच्या हक्कांची पायमल्ली होत आहे. पोलीस हा असाच एक विभाग आहे, जो दैनंदिन जीवनात बहुधा समोरासमोर असतो. गेल्या काही वर्षांपासून पोलिसांच्या कारवाईदरम्यान असंतुष्ट नागरिकांकडून मोबाइलमध्ये कारवाईचे रेकॉर्डिंग करण्याचा ट्रेंड वाढला आहे. अनेकवेळा असे करून असे कर्मचाऱ्यांना पोलिसांच्या रोषाला सामोरे जावे लागते. मात्र आता मुंबई उच्च न्यायालयाने नागरिकांना (नागपूर पोलीस) कारवाई करताना रस्त्यावर असो वा पोलीस ठाण्यात मोबाइल रेकॉर्डिंग करता येईल, असा अधिकार दिला आहे.

असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत

उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नागपुरात दाखल झालेल्या एका फौजदारी अर्जाच्या प्रकरणात एक आदेश पारित केला आहे, ज्यामध्ये केंद्र सरकारने पारित केलेल्या अधिकृत गुपित कायद्यांतर्गत प्रतिबंधित ठिकाणे स्पष्ट करण्यात आल्याचे म्हटले आहे. ज्यामध्ये पोलीस ठाणे सार्वजनिक ठिकाणे म्हणून घोषित करण्यात आली आहेत आणि तेथे व्हिडिओ रेकॉर्डिंगला मनाई नाही.



उच्च न्यायालयाच्या सूचनेवरून नागपूर पोलिसांनी आदेश जारी केला असून त्या अंतर्गत काही नियमांसह नागरिकांना मोबाइल रेकॉर्डिंगची परवानगी देण्यात आली आहे. नागरिकांना मोबाइल रेकॉर्डिंगची परवानगी देण्यात आली आहे.

या आदेशावर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले आहे. पोलीस अधिकारी आणि कर्मचारी हे लोकसेवक आहेत, पारदर्शकतेसाठी कोणत्याही नागरिकाला व्हिडीओ रेकॉर्डिंग करायचे असेल तर तो करूशकतो. यावर कोणतीही कारवाई केली जाणार नाही. पोलिस विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी हे प्रकार करणाऱ्या नागरिकांशी वाद घालू नयेत, असेही आयुक्तांनी सांगितले आहे. व्हिडिओ रेकॉर्ड करणाऱ्या व्यक्तीला महिला पोलिस कर्मचाऱ्यांच्या गोपनीयतेचा भंग होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.

बुथनिहाय कमिटी तयार करा-राजेंद्र जैन

गोंदिया: तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस पक्षाची महत्वपूर्ण बैठक राष्ट्रवादी काँग्रेस भवन येथे माजी आमदार राजेंद्र जैन, जिल्हाध्यक्ष गंगाधर परशुरामकर, जिल्हा बुथप्रमुख नरेश माहेश्वरी, प्रदेश प्रतिनिधी विनोद हरिणखेडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

या बैठकीत खासदार प्रफुल्ल पटेल यांची पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार सभारंभ पूर्व नियोजनाचा आढावा घेण्यात आला. तसेच प्रत्येक गावातील बुथवर युवक-युवती व महिलांना स्थान देऊन बुथ सशक्तीकरण करणे यावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. पक्षातील युवकांनी पुढे यावे व शासनाच्या अपयशाचा प्रसार-प्रचार करावा. संघटनेत युवकांना तसेच उत्साही व सक्रिय कार्यकर्त्यांना पक्षात संधी देऊन पक्षाची विचारधारा व संघटन मजबूत करण्यावर भर द्यावा. प्रत्येक बुथनिहाय सक्रिय व क्रियाशील प्रमुखांची निवड करण्यात यावी यासंबंधी सविस्तर चर्चा करुन निर्णय घेण्यात आला तसेच गोंदिया तालुका जिल्हा परिषद निहाय बुथप्रमुखांची निवड करण्यात आली.

बैठकीत रफीक खान, केतन तुरकर, बाळकृष्ण पटले, निरज उपवंशी, शंकर टेंभरे, रवी पटले, प्रदीप रोकडे, अखिलेश सेठ, मदन चिखलोंढे, गोविंद तुरकर, योगेश नाकाडे, संदीप मेश्राम,

लोकनाथ हरिणखेडे, किशोर ब्राम्हणकर, दानेश साखरे, आनंद तिरपुडे, प्रशांत बालशनवार, माणिक पडवार, कालू चव्हाण, राहूल यावलकर, सुरेंद्र रहांगडाले, ललीत ठाकुर, अतुल भांडारकर, बंटी शहारे, गणेश पुरी, आर.डी. अग्रवाल, अलकेश मिश्रा, खुशाल वैदय, रुपेश वासनिक, निखील नारनवरे यांच्यासह मोठ्या संख्येत पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

३४१ वर्ग खोल्या विद्यार्थ्यांच्या जिवावर उठल्या; ४०४ शाळा पाडण्या योग्य

गोंदिया: प्रगत शैक्षणिक महाराष्ट्राने प्राथमिक शिक्षणात आमुलाग्र बदल करण्याचा माणस बांधला असला तरी भौतिक सुविधेअभावी पाहिजे त्या प्रमाणात जिल्हा परिषद शाळांचे उत्थान होऊ शकले नाही. आजही जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या ३४१ वर्ग खोल्या विद्यार्थ्यांच्या जिवावर उठल्या आहेत. शासनाने जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांची गळती थांबविण्यासाठी प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र उपक्रम सुरु केला. या उपक्रमातून वाचन आनंद दिवस,

तालुकानिहाय नादुरुस्त वर्गखोल्या

अर्जुनी मोरगाव	४९
आमगाव	२८
देवरी	३६
गोंदिया	६५
गोरेगाव	४७
सालेकसा	४०
सडक-अर्जुनी	२७
तिरोडा	४९

ज्ञान रचनावाद, डिजिटल शाळा अक्षर सुधार कार्यक्रम असे विविध उपक्रम साजरे करण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्यार्थी शहरातील खासगी शाळांच्या विद्यार्थ्यांपेक्षाही स्मार्ट व्हावा यासाठी शिक्षण विभागाने विविध उपक्रम राबविले. भौतिक सुविधेसाठी गावची शाळा आमची शाळा हा उपक्रम सुरुच ठेवला.

परंतु अपुऱ्या निधीमुळे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ३४१ च्या घरात वर्गखोल्या ज्ञानार्जनासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत धोकादायक आहेत. अशी कबुली स्वत: जिल्हा परिषद देत आहे.

पावसाळ्यात धोका

गोंदिया, तिरोडा, गोरेगाव, सडक-अर्जुनी, आमगाव, अर्जुनी-मोरगाव, देवरी व सालेकसा या आठही तालुक्यात ३४१ वर्गखोल्या धोकादायक आहेत. मागील सहा वर्षापुर्वी तिरोडा तालुक्यातील ठाणेगाव येथील विद्यार्थ्यांचचा वर्गखोलीचे छत कोसळल्याने शाळेचत मृत्यू झाला होता. वर्गखोल्या धोकादायक आहेत. तरी देखील विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊन ज्ञानर्जन करावे लागत आहे.

शाळा दुरुस्तीसाठी निधी कधी मिळणार

गोंदिया जिल्ह्यातील ३४१ वर्गखोल्यांची वाईट अवस्था असल्याने त्या वर्गखोल्यांचे बांधकाम करण्यासाठी शासनाने त्वरित निधी मंजूर करावा. एकीकडे खासगी शाळा चकाचक असताना जिल्हा परिषदेच्या शाळा अश्रू ढाळत असल्याने या वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी निधी कधी मिळणार असा सवाल उपस्थित होत आहे.

शौचालयांची स्थिती वाईट

गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमधील शौचालयांचीही स्थिती अत्यंत वाईट आहे. मुला-मुलींसाठी असलेल्या शौचालयांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. मुलींसाठी वेगळ्या शौचालयाची सोय आहे. परंतु स्थिती बेकार आहे.

आता पावसाळा पुढे असल्याने नवगावकला येथील विद्यार्थ्यांना पावसाळ्यात शिक्षणासाठी वर्गखोल्यांची अडचण होते. जीर्णावस्थेत असलेल्या वर्गखोल्या पाडून त्या ठिकाणी नवीन वर्गखोल्या बांधण्यात याव्यात किंवा टिनपत्रे टाकण्यात यावीत, अशी मागणी शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायतकडून जिल्हा परिषदेकडे करण्यात आली आहे.

कार्तिक हेमने, सरपंन नवरगावकला

आदिवासी महिला शेतकऱ्यांनी मुरघास शेतीतून घेतले एकरी २५ हजाराचे उत्पादन

गोंदिया:- अदानी फाउंडेशन तिरोडा द्वारा जिल्हा प्रशासन गोंदियाच्या मार्गदर्शनाखाली तिरोडा तालुक्यातील घोटी गावातील ५० महिला शेतकऱ्यांना मका लागवड शेती व मुरघास निर्मितीचे प्रशिक्षण एग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्ट बारामती पुणे येथे देण्यात आले.

सदर प्रशिक्षणानंतर घोटी येथील ५० महिला शेतकऱ्यांनी ५० एकर शेतीमध्ये मका लागवड केली. त्यानंतर त्याचे मुरघास तयार करुन पाच रुपये किलो दराने तो मुरघास अदानी फाउंडेशन ने तयार केलेल्या तिरोडा शेतकरी उत्पादक कंपनी द्वारा सुरु असलेल्या अनुराधा डेअरी मधील दुग्ध उत्पादकांना विक्री

करण्यात आला. त्यामुळे दूध उत्पादन वाढीसाठी पशुपालकांना मदत झाली आहे.या माध्यमातून एकरी २५ हजाराचे उत्पादन तीन महिन्यांमध्ये महिला शेतकऱ्यांना मिळविले. पारंपरिक शेतीला फाटा देत मुरघास निर्मिती हा सुद्धा एक चांगला उत्पन्नाचा स्रोत या माध्यमातून शेतकऱ्यांना मिळाल्याचे अदानी फाउंडेशनचे हेड बिमुल पटेल यांनी सांगितले. सदर मका लागवड व मुरघास निर्मिती या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अदानी फाउंडेशनचे कार्यक्रमाधिकारी कैलाश रेवतकर व इतर कर्मचा?यांनी परिश्रम घेतले.

राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष जिल्हा दौऱ्यावर

गोंदिया : राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष निवृत्त न्यायमूर्ती आनंद निरगुडे बुधवार २१ जून २०२३ रोजी गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून ते विविध विषयांवर आढावा बैठक घेणार आहेत.

२० जून रोजी रात्री ८ वाजता ते भंडारा येथून गोंदिया येथे येणार आहेत. शासकीय विश्रामगृह येथे मुक्काम. २१ जून सकाळी ११ ते दुपारी १ दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हा जात पडताळणी समिती गोंदिया यांच्यासोबत चर्चा व जिल्ह्यातील सर्व जात प्रमाणपत्र निर्गमन अधिकारी यांच्याशी चर्चा व आढावा घेणार आहेत. दुपारी २.३० ते सायंकाळी ६ विश्रामगृह येथे राखीव व मुक्काम. २२ जून २०२३ रोजी सोईनुसार ब्राम्हपुरी जि.चंद्रपूर कडे प्रयाण.

उमरझरी प्रकल्प २६ वर्षांपासून अपूर्ण

गोंदिया: सिंचनाची व्यवस्था व्हावी म्हणून सडक अर्जुनी तालुक्यात गेल्या २६ वर्षापुर्वी उमरझरी मध्यम प्रकल्प तयार करण्यात आले. प्रकल्पामुळे तालुक्यातील शेतीला सिंचनाची सोय होईल, हा दृष्टिकोन पुढे ठेवून हा प्रकल्प उभारण्यात आला होता. मात्र, प्रकल्पाचा मुख्य कालवा पुढे आला नाही व शेतकऱ्यांचे स्वप्न भंगले.

उमरझरी मध्यम प्रकल्प सडक अर्जुनीपासून १९ किलोमीटर अंतरावर जांभळी गावाजवळ आहे. या प्रकल्पाचे मुख्य कालवा डोंगरगावाजवळ येऊन उभा ठाकला असून अधिकारी व नेत्यांच्या दुर्लक्षपणामुळे गेल्या २२ वर्षांपासून मुख्य कालवा ३ किलोमीटर पुढे वडेगाव गावापर्यंत येऊ शकला नाही. या प्रकल्पाची सिंचनाची क्षमता ५० हेक्टरपर्यंत आहे. त्यात प्रकल्पाचे खोलीकरण केल्यास आणखी २०-२५ हेक्टर

शेतकऱ्यांचे सिंचनाचे स्वप्न भंगले: पाठपुराव्याचा अभाव

शेतीला सिंचनाची सोय होऊ शकते. पण नेत्यांच्या दुर्लक्षपणामुळे खोलीकरण करण्याचे काम होत नाही. अधिकारी फक्त वरातीमागून घोडे नाचविण्याचा प्रकार करत असल्याचे चित्र दिसत आहे. प्रकल्पातील सिंचन क्षेत्रात पाटचाऱ्या नसल्यामुळे शेतीला सिंचन करताना शेतकऱ्यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. मुख्य कालव्याला ठिकठिकाणी भगदाड पडल्यामुळे लिकेजची समस्या जास्त असून रब्बी पिकाला पाणी पुरत नाही. यासाठी अधिकाऱ्यांनी नियोजन करण्याची नितांत गरज आहे. डोंगरगावपासून मुख्य कालवा हा वडेगाव गावाकडे तीन किलोमीटर पुढे आल्यास वडेगाववासीयांची सिंचनाची समस्या दूर होईल. गेल्या २० वर्षांपासून वडेगावला सिंचनाची सोय व्हावी, यासाठी अनेक नेत्यांच्या माध्यमातून पाठपुरावा करण्यात आला. पण कुठलाच फायदा झाला नाही. वडेगावला पाणी मिळेल का हो, अशी विनवणी वडेगावासी करीत आहेत. वडेगाव परिसरात कुठल्याच सिंचनाची सोय नसल्यामुळे ते निसर्गाच्या भरवशावर राहून खरीप पिके घेऊन समाधान मानत आहेत. वडेगावजवळील केसलवाडा, काळागोटा १ व २ येथील बंधाऱ्यावर उपसा सिंचन योजना बसवून वडेगावासीयांना सिंचनाची सोय झाली असती. पण गेल्या १५ वर्षापासून तो विषय प्रलंबित असल्यामुळे आता सिंचनाची समस्या कायम असल्याचे दिसत आहे.

वडेगावपर्यंत उमरझरी मध्यम प्रकल्पाचे पाणी आल्याशिवाय वडेगाव परिसरातील शेतकऱ्यांचा आर्थिक दर्जा उंचावू शकत नाही. निसर्गाच्या भरवशावर राहून खरीप पिके घेऊन जीवन काढावे लागत आहे. शेतकऱ्यांचे जीवन उंचावण्यासाठी सिंचनाची गरज आहे.

सुखराम ब्राम्हणकर, शेतकरी वडेगाव-सडक

गेल्या २० वर्षात उमरझरी मध्यम प्रकल्पाचे पाणी वडेगावपर्यंत कधीच पोहोचले नाही. कागदी घोडे रंगवून, आम्हा शेतकऱ्यांना आजपर्यंत काहीच फायदा झाला नाही. वडेगाववासीयांना सिंचनाच्या सोयीसाठी केसलवाडा उपसासिंचन योजना कार्यान्वित केल्यास सिंचनाची सुविधा होऊ शकते. सिंचन झाल्याशिवाय शेतकऱ्यांचा उद्धार होऊ शकत नाही.

कुंडलिक मुनीश्वर, वडेगाव-सडक